

॥ श्रीद्वारकानाथतीर्थ ॥

# श्रीद्वारकानाथतीर्थ

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी

**संकलन, संपादन, प्रकाशन :** चंद्रकांत शांताराम केणी, कार्यदर्शी, श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी, पर्तगाळ, काणकोण, गोवा. ४०३ ७०२

**मुद्रण :** सुरेश तिमाजी शे. काकोडकार, ओमेगा एन्टरप्राइझेस, विद्यानगर कॉलनी-३, विद्यानगर, मडगांव - गोवा. ४०३ ६०१

(**प्रकाशन तिथि :** फाल्गुन कृष्ण ६-ष्ठी शके १९१९, दि. १९ मार्च १९९८)

## श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींची जन्म पत्रिका



**जन्म-तिथि**

सिद्धार्थी संवत्सर, शालिवाहन शके १८४१, ज्येष्ठ कृष्ण अष्टमी, शनिवार (उ. भा. नक्षत्र)

**जन्म-तारीख**

२१ जून, १९१९

**जन्म-वेळ**

रात्रौ ११ वा. ०१ मि.

**जन्म-स्थल**

गंगोळ्ळी (द. कन्नड)

**।। जन्म लग्न कुंडली ।।**




**।। नवांश कुंडली ।।**



# श्रीद्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

| | | |
|---|---|---|
| जन्मतिथि | : | सिद्धार्थी संवत्सर शके १८४१, ज्येष्ठ कृष्ण ८मी, शनिवार, दि. २१ जून १९१९ |
| संन्यास दिक्षा | : | चित्रभानु संवत्सर शके १८६४, वैशाख कृष्ण ७ मी, दि. ७ मे १९४२ |
| गुरुवर्य श्रीकमलानाथतीर्थ स्वामीजींची मुक्ति | : | सुभानु संवत्सर, शके १८६५, चैत्र शु. ११शी, शुक्रवार दि. १६ एप्रिल १९४३ |
| श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामीजींच्या श्रीगुरुपीठारोहणाची तिथि | : | सुभानु संवत्सर, शके १८६५, चैत्र कृष्ण ८ मी, मंगळवार दि. २७ एप्रिल १९४३ |
| शिष्यस्वामी पदावरील कार्यकाळ | : | `११ महिने |
| श्रीगुरुपीठावरील कार्यकाळ | : | ३० वर्षे |
| शिष्य श्रीविद्याधिराजतीर्थांना संन्यासदीक्षा | : | पराभव संवत्सर, शके १८८८, माघ कृष्ण द्वितिया, दि. २६ फेब्रुवारी १९६७ |
| श्रीद्वारकानाथतीर्थांचे महानिर्वाण | : | परिधावी संवत्सर, शके १८९४, फाल्गुन कृष्ण षष्ठी, रविवार, दि. २५ मार्च १९७३, सकाळीं १०.२५ वा. |

# श्रीद्वारकानाथतीर्थ

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ हें वैष्णव संप्रदायी, श्रीमध्वानुयायी गौड सारस्वत ब्राह्मण समाजाचे एक प्रमुख गुरुपीठ आहे. गोव्यांत आणि देशांत सर्वत्र इतिहासवशात विखुरल्या गेलेल्या सारस्वत ब्राह्मण समाजाच्या अस्मितेचा व एकतेचा प्राणरक्षक मानदंड असें त्याला सार्थपणें संबोधतां येईल. या मठाची स्थापना श्रीनारायणतीर्थ यांनी श्रीशालिवाहन शके १३९७ मन्मथ नाम संवत्सरांत भटकळ येथें गोपी नदीच्या किनारीं, चैत्र शुक्ल द्वितियेला केली. त्यानंतर या मठाचा विस्तार ज्या पध्दतीनें झाला त्याची तुलना एका बिजांतून विस्तारलेल्या विशालकाय वटवृक्षाशींच करतां येईल. श्रीनारायणतीर्थ चैत्र अमावस्या शके १४३९, सोमवार, दि. २० एप्रिल १५१७ रोजीं वृंदावनस्थ झाले. तथापि त्यानंतरहि या मठाची परंपरा अखंड राहिलेली आहे.

## इतिहास

मठाची स्थापना झाली त्या सुमारास भारताचा पश्चिम भाग इतिहासाच्या दुर्दैवी फेऱ्यांत सांपडला होता. खुद्द गोव्यांत पोर्तुगीज अधिसत्ता प्रस्थापित होऊन त्यांनीं ख्रिस्तीकरणाचें सत्र आरंभिलें आणि अनेक लोक धर्म व संस्कृति-रक्षणासाठी आपापल्या कुलदेवांचे प्रतीक घेऊन महाराष्ट्र, कर्नाटक व केरळ सारख्या प्रदेशांत स्थलांतरित झाले. सामान्यपणें वेगळ्या वंशाच्या व भाषेच्या वातावरणांत नव्यानेंच स्थायिक होणारे लोक एक-दोन शतकें कशाला, एक-दोन पिढ्या उलटल्या कीं त्यांना आपल्या मूळ व्यक्तिमत्वाचा विसर पडून ते तेथील समाज जीवनाच्या अवतीभंवतीच्या परिसराचा भाग बनतात. पण स्थलांतरित सारस्वत समाजाच्या बाबतीत अशी गोष्ट घडली नाहीं. आपली मूळ भूमि सोडून अनेक शतकें उलटल्यानंतरहि त्यांनी आपले स्वतंत्र व्यक्तिमत्व, स्वभाषा, स्वसंस्कृति व स्वपरंपरा अबाधित राखली. याचे श्रेय मठानुयायांच्या अंगभूत प्रकृतीला जसें जातें, तसेंच, किंबहुना त्याहून अधिक प्रमाणात सारस्वत मठांच्या स्वामींना द्यावें लागेल. पर्तगाळी मठाच्या स्वामींनी जेव्हां जेव्हां संधि मिळाली तेव्हां तेव्हां शिष्यपरिवार पोहोंचला होता तेथें

तेथें जाऊन धर्म व संस्कृतीचा प्रचार व प्रसार केला आणि मठानुयायांना एकत्र ठेवणारा निष्ठातंतु बळकट बनविण्याचें महाकार्य केले. मठानुयायांचे वैयक्तिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यास व त्यांना एकसंघ राखण्यास मदत केली. परंतु मठाधिपतींनीं हे कार्य कितीहि निष्ठापूर्वक चालविलें तरी ऐतिहासिक कारणांसाठी त्यावर मर्यादा पडत होती. मुख्य मठ व बहुसंख्य शिष्यपरिवार जेथें होता तो गोवा पोर्तुगीजांच्या सत्तेखाली पारतंत्र्यांत दिवस कंठीत होता; तर मठानुयायी गोव्याबाहेर जेथें वास्तव्य करून होते ते प्रदेश विभिन्न व्यवस्थेखालीं विभागले गेले होते. परिणामी मठाच्या शिष्यपरिवाराचा आपसांतील संपर्क तुटला. समाजाचे एका अर्थानें परस्परांना एकत्र ठेवणारे धागेच तुटले व एकमेकात गुंतले गेले. मात्र गुंत्यांत अडकलेल्या या धाग्याचे एक टोंक दृढपणें मठाकडे राहिलें आणि म्हणूनच परस्परांशी संपर्क तुटूनही शिष्यपरिवाराची निष्ठा मठाशीं दृढपणे बद्ध राहिली.

१९४७ सालीं भारत स्वतंत्र झाला. १९६१ मध्यें गोवाहि मुक्त झाला. अशावेळी मठाकडे दृढपणे बद्ध असलेल्या निष्ठेच्या धाग्यांचा मागोवा घेत त्यांचीं टोकें एकत्र जमवून, तीं नव्यानें एकत्र जोडून, एक सलग धागा पुन्हा बनविण्याचा एक भाग म्हणून मठाचा पंचशताब्दि महोत्सव साजरा केला गेला. पोर्तुगीज राजवटींत गोव्यांत खूपच धार्मिक छळ झाला. देवालयें उद्ध्वस्त झालीं. समाज भंगला. पण मठाच्या मार्गदर्शनामुळें संस्कृति अभंग राहिली. समाज तुटला, पण नमला नाहीं. मठाच्या शिष्यपरिवारांत वसत असलेल्या त्या तेजस्वितेच्या सुप्त अंशाला फुंकर घालून मठानेंच तो प्रज्वलित केला. सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे जे अनेक प्रश्न निर्माण झाले ते स्वामींच्या आज्ञेने व हस्तक्षेपाने सामोपचारानें मिटविले गेले. संस्कृतीची उभारणी मंदिरांभोवतीं झालेली असल्यानें मंदिरे भंगलीं तेव्हां संस्कृतीच नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला असतां मंदिरांची पुन्हा प्रस्थापना करून संस्कृति विकसित करण्याचें कार्य मठाने केलें. जें गोव्यांत घडले तेच इतर राज्यांतहि घडले. आणि म्हणूनच सुदूर प्रदेशांतहि मठाचा शिष्यपरिवार एक लहानसें मंदिर उभारून एकोप्यानें राहूं शकला व त्याचा गोव्याकडील सांस्कृतिक सबंध कायम राहिला.

या पांच शतकांच्या इतिहासांत सारस्वतांची पुण्यभूमि मानल्या जाणाऱ्या गोमंतकांत जीं राजकीय स्थित्यंतरें घडलीं त्यांचे बरे-वाईट परिणाम समाजाला भोगावे लागले. परंतु कसोटीच्या प्रत्येक टप्पांत या मठाच्या आचार्यांनी समाजाला आवश्यक असें नेतृत्व व मार्गदर्शन देऊन समाजरूपी नौका यशस्वीपणें सुरक्षित

ठिकाणी नेऊन पोंचविली. प्रत्येक आचार्यांनी युगानुरूप कार्य केलें आणि त्या दृष्टीने ते युगपुरुषच ठरले. समाजाबद्दल अकृत्रिम कळवळा, अंगिकृत कार्य पूर्णत्वाप्रत नेण्यासाठीं यातना, वेदना व क्लेश सहन करूनहि तपःसाधनेत खंड पडूं न देण्याची निग्रही वृत्ती, धर्मशास्त्र ग्रंथांचे परिशीलन करून उपजत तल्लख बुद्धीला दिलेली ज्ञानाची जोड आणि कठोर साधनेद्वारे केलेला पुण्यसंचय यामुळे ज्या ज्या युगांत हे गुरुवर्य अवतरले त्या त्या युगाच्या समस्या हेरून आणि चाणाक्ष बुद्धीने भविष्यकाळाचा वेध घेऊन समाजाला त्यांनी अनुरूप दिशा लावून दिली.

गुरुपरंपरेकडून घडलेल्या सत्कार्याचें मूल्यमापन करावयाचे झाल्यास त्या त्या काळांतील राजकीय व सामाजिक पार्श्वभूमि लक्षांत घेऊन करावें लागेल. त्यांतहि समाज हा नेहमीं एकाद्या अभंग प्रवाहासारखा इतिहासांतून वर्तमानाकडे आणि वर्तमानाकडून भविष्याकडे वहाणारा असल्याने श्रीमठ परंपरेतील गुरूंनी केलेल्या कार्याचे स्वरूपहि गंगोत्रीपासून वाहणाऱ्या गंगेसारखे अव्याहत राहिलें आहे. ऋषिकेश येथें मैदानांत झेप घेणारे गंगाजल हेच पुढें प्रयाग येथे यमुना-सरस्वतीला आपल्यांत सामावून घेऊन त्रिवेणी संगम घडवून आणते आणि तेच जल जसे अखेर सागराप्रत पोंचत असतें, तशाच प्रकारचे कार्य श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ परंपरेंतील स्वामीजींचें राहिलेलें आहे.

## वेगळा काळखंड

श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींचें गुरुपीठारोहण झाले (शके १८६५ : सन १९४३) त्या सुमारास भारताच्या इतिहासाला नवी कलटणी मिळूं लागली होती. ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य कधीच अस्तंगत होत नाहीं अशी ख्याती होती त्या ब्रिटिश साम्राज्याने भारताला स्वातंत्र्य देण्याची तयारी चालविली होती. १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाला, परंतु गुरुपीठाचे मुख्यालय ज्या गोमंतभूमींत पर्तगाळक्षेत्रीं स्थित आहे, तो प्रदेश कधीं मुक्त होईल याची शाश्वती नव्हती. भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच गोव्याच्या स्वातंत्र्य आंदोलनाची तीव्रता वाढली होती आणि या संधिकाळांत गौड सारस्वत समाजाचे आध्यात्मिक नेतृत्व करण्याची जबाबदारी श्रीद्वारकानाथतीर्थांवर येऊन पडली. हा कांटेरी मुकूट त्यांनी हंसतमुखाने धारण केला. सत्त्व, तत्त्व व स्वाभिमान यांच्याशीं यत्किंचित्हि तडजोड न करतां, परकीय सत्तेपुढें नमण्यास नकार देऊन श्रीमठाची परंपरा अबाधित ठेवली, श्रीसंप्रदायाचे

मांगल्य व पावित्र्य अभंग राखलें आणि सर्वच क्षेत्रांत आघाडीवर राहून मठाची पताका उंचावर फडकत ठेवून समाजाचा माथा उन्नत केला.

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर विखुरलेल्या सारस्वत समाजाचा इतिहास हा कुलदैवतें व श्रीगुरुपीठें यांच्या अवतीं-भवतीं गुंफलेला आहे. समाजाने आपले व्यावहारिक प्रश्न सोडविण्यासाठीं गांव वसविले आणि जमीनजुमला आदि व्यावहारिक प्रश्न हाताळण्यासाठीं ग्रामसंस्था निर्माण केल्या. समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आध्यात्मिक प्रश्न सोडविण्याची जबाबदारी श्रीगुरुपीठांवर सोंपविण्यांत आली.

तसें पाहूं जातां भारतांतील इतर समाजांचीं वेगळीं धर्मपीठें आहेत. अशा कांहीं धर्मपीठांचा इतिहास फार पुरातन व गौरवशालीहि आहे. परंतु ज्या प्रकारच्या समस्यांना सारस्वत समाजाच्या गुरुपीठांना तोंड द्यावे लागले, तशा समस्या देशांतील इतर कोणत्याच समाजांत उद्‌भवल्या नाहींत. एक एक प्रश्न समाजापुढे गंभीर आव्हाने निर्माण करायचा आणि त्या आव्हानांना तोंड देतां देतां समाज विघटित आणि प्रंसगीं नेस्तनाबूत होण्याचा धोका संभवत होता. पण प्रत्येक खेपेला सारस्वत गुरुपीठांनी समाजाचें स्वत्व व स्वाभिमान शाबूत ठेवण्यासाठीं समर्थपणें हस्तक्षेप करून समाजाला कालानुरूप पावलें उचलण्याची प्रेरणा दिली.

त्यांतहि गोव्यांत मुख्यालय असलेल्या श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या स्वामीजींना प्रत्येक युगांत अभूतपूर्व अशा नव्या नव्या आव्हानांचा मुकाबला करावा लागला. द्विधा मनःस्थितींत अथवा संकटांच्या कात्रींत सांपडलेल्या समाजाने नेतृत्व व मार्गदर्शनासाठीं मोठ्या अपेक्षेने वेळोवेळीं धर्मगुरूंच्या चरणाकडे धांव घेतली आणि परिस्थितीचें योग्य निदान करून पीठावर अधिष्ठित असलेल्या स्वामीजींनी समाजाला सुयोग्य मार्गदर्शन करून संकटमुक्त केलें. त्यामुळेंच सर्व प्रकारचे आघात सहन करूनहि गौड सारस्वत ब्राह्मण समाज अभंग राहिला. समाज केवळ अभंग राहिला इतकेच नव्हे तर एकामागून एक अशा अग्निदिव्यांतून सहीसलामत पसार झाल्यामुळें तो तावून सुलाखून निघाला. त्याची तेजस्विता वाढली. मोडेन पण झुकणार नाहीं ही भावना बळावली आणि धर्म नि धर्मिकता, कुलदैवतें व गुरुपीठें यांजवरील त्याची निष्ठा, श्रद्धा व भक्ति अधिक दृढ झाली. याचें सारें श्रेय श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठालाच द्यावें लागेल.

श्रीमठ परंपरेंतील बाविसावे गुरुस्वामी श्रीद्वारकानाथतीर्थ पीठासीन झाले तो काळ समाजाच्या दृष्टीने अनिश्चिततेचा व अशांत होता. देश स्वतंत्र होण्याची ती

पूर्वसंध्या होती. पण सारस्वतांची पुण्यभूमि गोमंतकाचें राजकीय भवितव्य अधांतरीं होतें. या संक्रमणावस्थेंत श्रीद्वारकानाथतीर्थांनी समाजाचें नेतृत्व केलें. १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाला आणि गोव्यांतील स्वातंत्र्य आंदोलनाची तीव्रता वाढली. इतिहासांत पांच शतकांपूर्वीं भिन्न राजकीय व्यवस्थांमध्यें विखरून गेलेल्या समाजाच्या एकीकरणाची प्रक्रिया गोवा स्वतंत्र झाल्याशिवाय सुरू होणार नाहीं याची स्वामीजींना कल्पना होती. तोंपर्यंत अत्यंत काळजीपूर्वक गोव्यांतील व गोव्याबाहेरील समाजाशीं सतत संपर्क ठेवून समाजांतर्गत उद्‌भवलेले अनेक प्रश्न त्यांनी हळुवारपणें हाताळले. या संधिकाळांत समाजाचा नैतिक ऱ्हास होऊं नये आणि कुलदैवतें व गुरुपीठांवरील त्यांची श्रद्धा अतूट ठेवावी या विचाराने त्यानी अनेक कार्यक्रम आंखले आणि समाजाला योग्य मार्गदर्शनहि केलें. आणि १९६१ अखेर जेव्हां गोवा स्वतंत्र झाला तेव्हां समाज संघटनेच्या कार्याला त्यांनी विलक्षण चालना दिली.

त्यांच्या कारकीर्दीचा आढावा घेतांना साहजिकपणे आपणांत परंपरेंतील इतर स्वामीजींच्या कार्याची कल्पना येते आणि एक गोष्ट ठळकपणें जाणवते कीं जेव्हां जेव्हां समाज अडचणींत आला तेव्हां तेव्हां त्या अडचणींचें निवारण करणारे स्वामी समाजाला लाभले. एक प्रकारे धर्मसंस्थापनेसाठीं श्रीमठ परंपरेंतहि भिन्न भिन्न सिद्धपुरुष अवतरले.

पीठाधिपती म्हणून श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामींची योजना झाल्या नंतरचा काळ तत्पूर्वींच्या शे-दीडशे वर्षांच्या काळाहून संपूर्णपणे वेगळा होता. धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक व राजकीय- सर्वच दृष्टीनी वेगळा. १९३९ साली दुसरें जागतिक महायुद्ध सुरू झाले आणि १९४५ मध्ये त्याची इतिश्री झाली. या महायुद्धाने जगांत जी उलथापालथ झाली त्यातून आपला देश सुटला नाही. देशातील लोकांच्या आचार विचारात इतका क्रांतिकारक बदल झाला की १९४५चे जग हे तत्पूर्वीच्या जगाचे काहीही देणे लागत नाही असे वाटावे. सामाजिक क्षेत्रांत एकत्र कुटुंब पद्धतीला जबरदस्त हादरा बसला. नोकऱ्यांची सुबत्ता झाल्यामुळे आणि स्त्रीशिक्षणाचे प्रमाण वाढून स्त्रियानी सर्व क्षेत्रातील नोकऱ्यात पदार्पण केले. स्त्री आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र झाल्यामुळे कांही नवे प्रश्न निर्माण झाले. धर्म, रूढी परंपरा यांच्या विषयींच्या श्रद्धाना तडा गेला. नीतिकल्पना उलट्यापालट्या झाल्या.

राजकीय दृष्ट्या तर सर्व जगांतच स्थित्यंतरे झाली. काही ठिकाणी होत्याचे नव्हते झाले, तर इतर ठिकाणी नव्हत्याचे होते झाले. याचे एक उदाहरण म्हणजे भारत-पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिती. या देशाच्या स्वातंत्र्याचे वेध युद्ध

संपले तेव्हापासूनच लागले होते. त्या पूर्वी १९४२चे महान आंदोलन भारतात झाले होते. गोव्यात १९४६ सालीच नागरिक स्वातंत्र्याचे आंदोलन सुरू झाले होते आणि स्वातंत्र्याची चळवळ तीव्र झाली होती. दहशतवादाचा एक स्वतंत्र प्रवाह सनदशीर सत्याग्रहाच्या चळवळीबरोबरच सुरू झाला होता. १९५५ च्या सामुदायिक सत्याग्रहाने व त्यातील हत्याकांडाने सारा भारत ढवळून निघाला आणि साऱ्या जगाचे लक्ष त्याने वेधून घेतले होते.

१९६१ साली भारताने गोवामुक्ती घडवून आणली व प्रथम लष्करी आणि मग लोकप्रिय सरकारची राजवट गोव्यात चालू झाली होती.

अशा राजकीय व सामाजिक परिवर्तनाचा हा संधिकाळ होता. बदलत्या काळाप्रमाणे व्यक्तीने बदलणे, समाजाने बदलणे आणि धार्मिक दृष्ट्या समाजाचे नियमन करणाऱ्या धर्मपीठांनीही बदलणे भाग होते. म्हणूनच या बदलत्या काळात श्रीगोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाच्या पीठावर आलेल्या या आचार्यांच्या कारकीर्दीचा स्वतंत्र कालखंड मानणे उचित वाटतें.

श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामी हे परंपरेने २२वे आचार्य. श्रीकमलानाथतीर्थ यांचे ते शिष्य. सन १९४३ ते १९७३ अशी तीस वर्षांची त्यांची कारकीर्द. ही कारकीर्द अगदी अलिकडली. अजून इतिहासात जमाही न झालेली. लाखो लोकांनी त्याना पाहिले असेल, हजारो लोकानी त्यांचे प्रत्यक्ष आशीर्वाद घेतले असतील आणि शेकडो लोकाशी त्यांचा निकटचा संपर्क आला असेल. हे लोक आज विद्यमान आहेत. स्वामीजी विषयीच्या त्यांच्या आठवणी आजही ताज्या आहेत. त्यांची तेजः-पुंज शरीरयष्टी, त्यांची विद्वत्ता, सामाजिक कार्याबद्दलची कळकळ, संस्थानचा अभिमान, नवनव्या भव्य योजना आंखून त्या कार्यान्वित करण्यासाठी लागणारी जिद्द, त्यांची लोकेषणा व लोकसंग्रह करण्याची कुशलता, समाजात स्वास्थ्य व समन्वय निर्माण करून समाजोन्नती साधण्याची वृत्ति, शिक्षण प्रसाराची आवड, साहित्यादि कलांबद्दल आस्था या त्यांच्या अंगी असलेल्या गुणांमुळे त्यांच्या प्रभावाखाली आलेल्या सारस्वत व सारस्वतेवर लोकांनाहि त्यांच्याविषयी आपुलकी व आदर वाटे.

## बालपण व विद्याभास

श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींचा जन्म दक्षिण कन्नड जिल्ह्यातील कुंदापूर शहराजवळ असलेल्या गंगोळी गांवचा. या गावात सेनापूर आचार्य नावाचे एक प्रसिद्ध पंडित घराणे आहे.

करणारें एक गौरवपत्र श्रीस्वामीजींच्या चरणीं अर्पण केलें. शिष्य परिवाराच्या भावनांना वाचा फोडणारें हें गौरवपत्र उद्धृत करणे अप्रस्तुत ठरूं नये.

*परमपूज्य श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीमहाराज! आपला सदैव जयजयकार असो.*

***श्री****हरीच्या सत्तेनें जगाची उत्पत्ति-स्थिति-लय होतात, असें शास्त्रांत सांगितलें आहे. पण त्या सत्तेचें ज्ञान श्रीगुरूच्या बोधाशिवाय होत नाही व ज्ञानाचें विज्ञान श्रीगुरूच्या कृपेशिवाय घडत नाहीं, आणि श्रीगुरुकृपा श्रीगुरूच्या सेवेशिवाय हाताला चढत नाहीं. याकरितां श्रेयोभिलाषी मनुष्यानें गुरुकृपासंपादन करण्यासाठीं गुरुसेवा करण्यास तत्पर राहिलें पाहिजे. आज आम्ही गौड सारस्वत वैष्णव ब्रह्मवृंद त्यासाठींच येथें जमलों आहोंत.*

***द्वा****राशिवाय गृहांत प्रवेश होत नसतो. हरिकृपामंदिराचें गुरुकृपा हें द्वार आहे व गुरुकृपाद्वाराची गुरुसेवा ही पायरी आहे. ह्या पायरीवर उभे राहून तें द्वार उघडण्यासाठीं आम्हीं आज येथें आलों आहोंत. आपण गुरुमाउलीनेंच तें उघडें करून आम्हांला आंत घेतलें पाहिजे.*

***र****जतमाचा नाश करून सत्त्वाची वृद्धि केल्याशिवाय परमार्थाची प्राप्ति होत नाही, असें भागवतांत सांगितलें आहे. पण त्याची प्रक्रिया गुरुमुखानेंच समजली पाहिजे. ती सांगून शिष्यांना भवसागर तरण्याचा अमोघ उपाय सांगणारे आम्हांला आज आपल्यासारखे ज्ञानसंपन्न गुरु लाभले आहेत हें आम्हीं आमचें महद्‌भाग्य समजतों.*

***काश्यां मरणान्मुक्तिः*** *हें पुराणवचन प्रसिद्ध आहे, त्याचा अर्थ काशीक्षेत्रांत मरण आलें असतां मुक्ति प्राप्त होते असा आहे. पण मुक्तीचें कारण केवळ काशीमरण हें नसून जगद्‌गुरु श्रीशंकराचा वास तेथें आहे व प्रत्येक जीवाला मरतेवेळीं शंकर त्याच्या कानांत रामतारक मंत्राचा उपदेश करितो, त्यामुळें मुक्ति घडते हें होय. अर्थात् रामनामाची ही शक्ति आहे. त्या शक्तीचा प्रवेश शिवगुरूच्या मुखानें जीवाच्या हृदयांत होत असतो. त्याप्रमाणें आपल्या हृदयांत श्रीगुरु श्रीमत्कमलानाथतीर्थ व परमगुरु श्रीमद् इंदिराकांततीर्थ ह्या उभय गुरुदेवांच्या शक्तीचा प्रवेश झालेला आहे.*

***नायमात्मा बलहीनेन लभ्यः*** *हें श्रुतिवचन प्रसिद्ध आहे. आपल्या शरीरांत उभय गुरुदेवांच्या बलाचा प्रवेश अथवा आवेश आहे हें आमचें म्हणणें औपचारिक नसून त्यांत सत्य भरलेलें आहे. आपण श्रीमत्कमलानाथतीर्थांचे प्रत्यक्ष शिष्य असलां तरी,*

*श्रीमद् इंदिराकांततीर्थांची प्रत्यक्ष सेवा प्रायः एक तप केली आहे व ती इतर कांहीं शिष्यांप्रमाणें टंगळमंगळपणाची नसून, तिळमात्रही चित्तशाठ्य न करितां पूर्ण श्रद्धेनें व कायावाचामनानें आपणाकडून घडली आहे. त्या सेवेचें महत्तर तपोबल आपल्या ठिकाणीं आहे. आणि श्रीमत्कमलानाथतीर्थांनीं तर अंतःकाळीं आपल्या नेत्रांत वेधशक्तीनें अवलोकन करून आपली सर्व शक्ति आपणांत ओतली आहे हें सर्वांनी पाहिलेंच आहे. आपलें स्वतःचें व्यक्तिमत्वही कमी नसून उच्च दर्जाचें आहे. अर्थात् आपण त्रैमूर्त्यात्मक श्रीदत्तात्रेय देवाप्रमाणेंच आम्हाला अत्यंत पूज्य आहांत.*

***थ**कल्या भागल्या जीवाला विश्रांतीची जरुरी असते. मनुष्य दिवसभर श्रम करितो, त्यामुळें होणारी शरिरांतील तत्त्वांची झीज भरून निघण्यास त्याला देवानें म्हणजे निसर्गदेवतेनें निद्रा करून ठेवलेली आहे. शरीराचे श्रम नाहींसे होण्यास जशी निद्रा उपकारक असते, तसे जीवाचे श्रम नाहींसे होण्यास मरण हें उपकारक आहे. आम्हांला आमच्या प्रिय जनांचा वियोग हा अपकारक वाटतो, पण त्या जीवाला निसर्गनियमानुसार उपकारकच असतो. 'तत्सुखसुखित्वम्' ह्या श्रीनारदभक्तिसूत्राप्रमाणें त्या जीवाच्या दृष्टीनें म्हणजे ज्या जीवाला मरणापासून सुख झालें आहे. ह्या भावनेनें आपण समाधानच मानलें पाहिजे. वियोगजन्य दुःख हें मोहजन्य असल्यामुळें विवेकानें विसरलें पाहिजें.*

***ती**व्र मुमुक्षु ज्याप्रमाणें आपल्या संसाराला विसरून निजकल्याणाकरितां संन्यस्त वृत्तीनें राहतो, त्याप्रमाणें आपले गुरु व परमगुरु यांचा दुःसह वियोग निष्ठूर वृत्तीनें व निजज्ञानानें विसरून, त्या गुरुदेवांची जी निजजनकल्याणाची निरंतरची इच्छा, ती पूर्ण करण्याकरितां आपण बद्धपरिकर होऊन निज वैष्णवधर्माची आपल्या समाजांत जागृति करण्यास तत्पर राहिलें पाहिजे. ह्या आपल्या तत्परतेंत आद्यगुरु श्रीमन्मध्वाचार्यांपासून निजगुरु श्रीमत्कमलानाथतीर्थांपर्यंतची सर्व शक्ति उतरणार आहे.*

***रत्नं समागच्छतु कांचनेन**, असें म्हणतात. त्याप्रमाणें समस्त गौड सारस्वत वैष्णव ब्रह्मवृंदामधील आपण रत्न असून, श्रीरमापति रामदेवाच्या संकल्पानुसार गोकर्णमठरूपी कांचनांत येऊन बसलां आहांत. गोकर्णमठाची मुद्रिका म्हणजे गादीचा शिक्का आपल्या हातांत आला आहे. रामनाममुद्रिका मुखांत धरल्यामुळें लंकेचा शतयोजन विस्तीर्ण समुद्र तरून जाण्यास मारुतिराय समर्थ झाले, त्याप्रमाणें प्रस्तुत कालीं पसरलेला धर्मविमुखतेचा महासागर आपल्या शिष्यजनांस तरून जाण्यास*

किंवा तो समुद्र आटवून टाकण्यास श्रीगोकर्णमठाच्या मुद्रिकेमुळें आपण समर्थ व्हाल अशी आम्हांस आशा आहे.

थवेच्या थवे इतर वानरांचे होते, तथापि सीताशुद्धि ही एका कपिवीर मारुतिरायानेंच केली; पण त्याला त्याच्या अंगभूत शक्तीची जाणीव म्हणे जांबवंतानें करून दिली. कारण अद्‌भुत शक्ति अंगी असली तरी त्याबद्दलची जाणीव दुसऱ्या कोणी तरी करून दिल्याशिवाय ती जागृत होत नसते, असें रामायणांत सांगितलें आहे. त्याप्रमाणें श्रीगोकर्णमठमुद्रिकेच्या शक्तीची किंवा तिच्यामुळें आपल्या अंगीं आलेल्या शक्तीची आम्हीं आपणास जाणीव करून देत आहोंत. असें करतांना आमचा थोडासा मर्यादातिक्रमच होईल; परंतु आमच्या अंतरांतील कळकळीकडे व सद्‌भावनेकडे नजर देऊन त्याची आपण क्षमा कराल व आमच्या धर्माचा तौलनिक दृष्टीनें विचार करण्याची ज्यांची पात्रता नाहीं असे अपात्रतेचे अर्क लोकही आमच्या धर्मावर पुनरेव आक्रमण करून तो नामशेष करून सोडण्याकरितां आज विश्वप्रयत्न करीत आहेत, तो त्यांचा प्रयत्न मृगजलाप्रमाणें व्यर्थ करून टाकाल; तसेंच आपल्या समाजांतीलच नव्हे, तर अखिल जगांतील धर्मविमुखतेचा महासागर तरण्यास किंवा अगस्त्य ऋषी होऊन शोषून टाकण्यास तयार व्हाल अशी आम्हीं आशा करितों.

कीर्ति, यश किंवा सुख हें केवळ प्रयत्नावरच अवलंबून असतें, तर जगांत आज एकही व्यक्ति दुःखी व दरिद्री राहिली नसती, त्या प्रयत्नाच्या पाठीमागें भगवंताचें कृपाधिष्ठान असलें, तरच प्रयत्नास यश येतें. हें अधिष्ठान आपण एकनिष्ठ गुरुसेवेनें प्राप्त करून घेतलें आहे. आणि म्हणूनच आज ह्या पवित्रतम पीठावर आरूढ झालां असून हा पवित्र समारंभ पाहण्याचें भाग्य आम्हां सर्वांस लाभलें आहे याबद्दल आम्ही स्वतःला मोठे धन्य समजतों.

जगन्नायकाचा नाममंत्र म्हणजे जगदीशाची कृपा आकर्षणाचें यंत्र आहे, असें शास्त्र व संत सांगतात. आमचे परमगुरु श्रीइंदिराकांततीर्थमहाराजांनी पणजीच्या महासभेंत **"हरे राम हरे राम, राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे"** हा षोडश नामात्मक व बत्तीस अक्षरात्मक मंत्र कामधेनु-कल्पतरूप्रमाणें असून, सर्वारिष्टशांतिपूर्वक समस्तमंगल प्राप्तीचें सुलभ साधन आहे असें सांगितलें. आज हिंदुस्थानांत जगच्छांतीकरितां व राष्ट्रकल्याणाकरितां ह्या मंत्राचाच जप सर्वत्र चालला आहे. ज्याप्रमाणें परमात्मा सर्वत्र व सर्व काळ संपूर्णपणें असला तरी जगदुद्धारार्थ आपण स्वतः न येतां आपली सर्व शक्ति म्हणजे अधिकार आपल्या नामांत ठेऊन नामानेंच जगदुद्धार चालवित आहे. अगदीं गरजच पडेल तेव्हां श्रीहरि

*स्वतः अवतरत असतो किंवा भगवत्कार्यसाधक असे वैष्णववीर जगांत पाठवितो, त्याचप्रमाणें श्रीइंदिराकांततीर्थांनाही श्रीमत्कमलानाथतीर्थ गादीवर बसण्यापूर्वीं वीस बावीस वर्षे, त्यांच्याच नांवानें म्हणजे सहीशिक्क्यानें संस्थानचा सर्व कारभार चालविण्यास मुभा दिली होती. आपण हयात असतांनाही ते प्रत्यक्ष त्यांत भाग घेत नसत. सर्व तऱ्हेचा व्यवहार त्यांकडून करवित असत. आवश्यकच असल्यास त्यांत ते मन घालीत. आपणही त्यांचेच मानसशिष्य असल्यानें त्यांची स्वजन कल्याणाची राहिलेली इच्छाही आपणाकडून पूर्ण होणार असें आज जो तो म्हणत आहे, हें सुचिन्ह होय.*

***यतो धर्मस्ततो जयः**, या अमोघ वचनाप्रमाणें कलिकालाशीं झुंजून इहपर सुखाचें स्वाराज्य अथवा स्वराज्य मिळविण्याकरितां आपण समाजांत धर्मजागृति केली पाहिजे. कारण **इहपर कल्याण हा जीवांचा जन्मसिद्ध हक्क आहे**. तेव्हां हें सुखाचें साम्राज्य स्थापण्याकरितां '**संग्रहेण कुलीनानां राज्यं कुर्वन्ति पार्थिवाः**' ह्या वचनाप्रमाणें योग्य पुरुषांना हाताखालीं धरून अथवा तसे धर्मवीर पुरुष निर्माण करण्यासाठीं शाळा व कॉलेजें म्हणजे गुरुकुलें काढून आजपर्यंत कोणीं केलें नाहीं तसलें कार्य करून गादीची म्हणजे पीठाची कीर्ति आपण वाढविली पाहिजे. असें करण्यास श्रीरामदेववीरविठ्ठल आपणास दीर्घायुष्य, दृढारोग्य व सुधीर सामर्थ्य देवोत, अशी आम्हीं त्यांच्या चरणीं प्रार्थना करितों. (सीताकांत स्मरण जय जय राम! पुंडलीक वरदा हरि विठ्ठल! श्रीमदिंदिराकांततीर्थ स्वामीमहाराजकी जय! श्रीमत्कमलानाथतीर्थ स्वामीमहाराजकी जय! श्रीमद्द्वारकानाथतीर्थ स्वामीमहाराजकी जय!) ॐ तत्सत्.*

*मुक्कामः पर्तगाळ - श्रीगोकर्णमठ, चैत्र व. ८ मी मंगळवार श. १८६५.*

## धार्मिक दृष्ट्या शांततेचा काळ

शके १८६५ ते १८९४ हा तीस वर्षांचा श्रीद्वारकानाथतीर्थांच्या कारकीर्दीचा काळ. हा काळ धार्मिक व सामाजिक दृष्ट्या श्रीइंदिराकांततीर्थांच्या काळाप्रमाणे वादळी नव्हता. उलट या क्षेत्रांतील सारीं वादळें शांत होऊन सारस्वत ब्राह्मण समाजाने सर्व सुधारणा पचविल्या होत्या. क्षुल्लक कारणामुळे ग्रामण्यें निर्माण होण्याचा काळ मागे पडला होता. समाजाची सामाजिक व भौतिक प्रगति झपाट्याने होत चालली होती. सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना शिथिल झाल्या होत्या. 'अष्टवर्षाभवेत्कन्या' हा स्मृतीचा **आदेश लोक केव्हाच** विसरून गेले होते. आणि मुलामुलींचीं

लग्नाचीं वयें वाढलीं होतीं. परदेशगमन सर्रास होत होते.

पण हे सर्व होऊनही सारस्वत ब्राह्मणांत आणि अर्थातच वैष्णव सांप्रदायिकात धार्मिक भावनांचा लोप मात्र झाला नव्हता. कर्मकांडाच्या बंधनातून समाज सुटत होता; पण धर्मतत्त्वाचा पगडा कायम होता. म्हणूनच सारस्वतांचीं सर्व देवस्थानें यथापूर्व वैभवाने चालू होतीं. पीठाधीशांचा धार्मिक अधिकार समाजाला शिरोधार्य होता. श्रीद्वारकानाथतीर्थांसारखे पीठाधीश विद्वान व समाजहितैषी असल्याने त्याना समाजाचा आदर व प्रेमही लाभले होते. समाज व धर्मपीठ यांच्यांत विचारांची व परकेपणाची दरी राहूं नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले; आपल्या मठाच्या अनुयायांचेच नव्हे, तर एकूण समाजाचें कल्याण करण्याच्या योजना आंखल्या आणि म्हणूनच त्या तीस वर्षांच्या परंपरा-मुक्ततेच्या काळांतहि त्यांनी समाजाकडून आदर मिळविला.

## कर्तबगार स्वामी

एखाद्या प्रतिभासंपन्न समाज धुरिणाप्रमाणे हे स्वामीजी कल्पक होते आणि एखाद्या कर्तबगार संचालका प्रमाणे मनांत योजलेल्या कल्पना अंमलांत आणणारे कार्यदर्शी होते. पर्तगाळ व मुंबई येथें संस्कृत पाठशाळा, पर्तगाळ येथें एक हायस्कूल व संस्कृत भाषेला व भारतीय तत्त्वज्ञानाला प्राधान्य असलेले कॉलेज, धार्मिक ग्रंथ प्रकाशित करणारी प्रकाशन संस्था, वैदिकी व भिक्षुकी करण्यासाठीं योग्य तेवढें शिक्षण देणारी पाठशाळा, ठिकाठिकाणी असलेल्या जुन्या मठांची डागडुजी व नव्या ठिकाणी नव्या मठाची उभारणी, अशा कित्येक योजना त्यांनी मनाशी योजिल्या होत्या. त्या दिशेने पूर्वतयारी चालविली होती. स्वामीजींनी केवळ आपल्या कल्पना साकार करण्यासाठीं अनेक ठिकाणी अनेकदां संचार केले. आपल्या ऋजू स्वभावाने व गोड वाणीने लोकसंग्रह केला. निरनिराळ्या कार्यांसाठीं लाखो रुपयांचा निधी उभारून त्यांचा योग्य विनियोग केला. त्यांच्या कारकीर्दीत निर्माण झालेल्या अस्थिर राजकीय परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन आणि मुत्सद्देगिरी वापरून, मठाचे अस्तित्व टिकवून, त्याची व त्याच्या कार्याची व्याप्ति वाढविण्याचें उद्दिष्ट गांठण्याची पराकाष्ठा केली. हें काम करताना त्यांनी मठानुयायी सांप्रदायिकां प्रमाणेच इतर वर्गानाहि कार्य प्रवण केले.

पर्तगाळ येथें संस्कृत महाविद्यालय सुरू करण्याची त्यांची कल्पना व्यावहारिक अडचणी, राजकीय आडकाठ्या व तांत्रिक अडसर यांमुळें अंमलांत येऊं शकली

नाहीं. आपला समाज धार्मिक दृष्ट्या विस्कळीत आहे कारण आपलीं धर्मपीठें विस्कळीत आहेत. त्यांच्यांत प्रथम सामंजस्य व सहकार्य निर्माण केलें पाहिजे. स्मार्त, वैष्णव, द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, गौड, द्रविड अशा अनेक प्रकारच्या भेदांनी समाज व धर्मपीठें संकुचित अभिमानाने वेगळीं पडलीं आहेत. त्यांच्यांत प्रथम एकी केली पाहिजे. तसें केल्यानेच हिंदु धर्माला आजच्या स्थितींतही तेज चढेल असे त्यांचे विचार होते. आणि हे विचार कृतींत आणण्यासाठीं त्यानी पावलेंहि उचलली.

## सर्वधर्म परिषदेंत सहभाग

सारस्वतांतील वैष्णव संप्रदायाचे जे गोकर्ण-पर्तगाळ व काशी असे दोन मठ आहेत, त्यांच्यांतील वैमनस्य श्रीइंदिराकांततीर्थ स्वामींच्या काळांत नष्ट होऊन ह्या दोन्ही मठांचे पीठाधीश अधिक जवळ आले होते. श्रीद्वारकानाथतीर्थांनी हें सूत्र आणखी पुढें नेलें. त्यांनी उडुपीच्या द्रवीड अष्टमठांपैकी कांही पीठाधीशांच्या भेटी घेतल्या. श्रृंगेरी, कुडली आणि सारस्वतांतील स्मार्त सांप्रदायांपैकी चित्रापूर पीठाधीशांशी संपर्क जोडला आणि समाजांतील धर्म व संस्कृतीविषयक उदासीनता कशी नष्ट करतां येईल याबद्दल विचारविनिमय केला. मठामठांत वैमनस्य असूं नये यावर भर दिला. श्रीक्षेत्र उडुपी येथें मध्व-तत्त्वज्ञान परिषद भरली होती. त्या परिषदेंत भाग घेऊन समन्वयाचें हेंच धोरण पुढें रेटलें. सन १९६६ सालीं याच परिषदेचें चौथें अधिवेशन कोईंबतूर येथें भरलें होतें. या परिषदेचें उद्घाटन करतांना त्यांनी जी आशयघन अशीं संस्कृत व कन्नड मधून भाषणें केलीं, तीं फार गाजलीं. १९५४ च्या ६ व ७ नोव्हेंबरला मुंबई येथें सुंदराबाई हॉलमध्यें जैनमुनी श्री सुशील कुमारजी भास्कर यांच्या प्रयत्नाने विश्वधर्मपरिषद भरली होती. मुंबईचे तत्कालीन मुख्य प्रधान मोरारजी देसाई हे उद्घाटक होते. मुस्लीम, ख्रिस्ती, बौद्ध, पारशी, शीख इ. धर्म आणि हिंदु धर्मांतील अनेक पंथांचे आचार्य यांची आपापल्या धर्म व पंथाबद्दलचीं भाषणें या परिषदेंत झालीं. वैष्णव पंथातर्फे श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींनी भाग घेऊन भाषण केलें. स्वामीजींनी केलेलें हे भाषण म्हणजे हिंदू धर्माच्या समन्वयवादावर केलेलें एक अप्रतिम भाष्य होतें. या भाषणांत त्यांनी हिन्दू धर्माचीं तत्त्वें विशद केलीं. वेगवेगळ्या पंथांतील भेद सांगितले. वैष्णव संप्रदायाची माहिती दिली. पण या सर्वांपेक्षां समाजास धर्माची गरज कां आहे, धर्माला शास्त्राची जोड कां दिली पाहिजे, यावर विवरण करून गीताग्रंथ हा सर्व मानव जातीला आदर्श ठरणारा ग्रंथ कसा

आहे याचेंही मार्मिक विश्लेषण केलें.

ज्या सर्वधर्मसमन्वयवादाचे प्रतिपादन तत्पूर्वी स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेंत केलें होतें आणि तो सर्वधर्म समन्वयवाद भारतांत आणि हिंदू धर्मांत कसा एकजीव झाला आहे हें दाखवून दिलें होतें त्याची आठवण श्रीद्वारकानाथतीर्थांनी आपल्या भाषणांतून सर्वधर्मपरिषदेला करून दिली. त्यांच्या भाषणांतील उद्धृत केलेल्या पुढील उताऱ्यावरून स्वामीजींच्या ध्येयवादाची कल्पना येऊं शकेल. श्रीद्वारकानाथतीर्थ म्हणाले : "वैदिक मतप्रणालीप्रमाणें बुद्ध, जैन, लिंगायत व शीख असेही धर्म व पंथ हिंदु समाजांत निर्माण झाले. त्यांच्या मध्ये व मूळच्या वैदिक मतांनुयायांमध्यें त्या काळीं संघर्ष झाले असतील. पण आज आपण सर्व एका हिंदु समाजांत आपापल्या मताला व पंथाला अनुसरून नांदत आहोंत. याखेरीज पारशी हा समाज एक हजार वर्षांपूर्वी भारतांत येऊन स्थिर झाला. येताना तो आपला धर्म घेऊन आला. भारताने त्यास आश्रय दिला व येथें रहाण्यास प्रोत्साहन देऊन आपले परंपरागत सहिष्णुत्व व्यक्त केलें. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत ख्रिस्त शिष्य सेंट थॉमस दक्षिण हिंदुस्थानांत येऊन त्याने आपल्या ख्रिस्तमताचा उपदेश केला. त्या उपदेशांतील ख्रिस्ताच्या पर्वत प्रवचनातील दश-आज्ञा मानवधर्माच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. त्यांत असहिष्णुतेचा अंशही नाहीं. सत्यासाठीं मृत्यु कवटाळून हुतात्मापदास पोचलेल्या येशू ख्रिस्ताच्या आज्ञा सर्वांना क्षमाशांतीचा मार्ग दाखविणाऱ्या, एकता शिकविणाऱ्या, अहिंसा, सत्य, सन्मार्ग, आर्तसेवा यांचा पाठ देणाऱ्या आहेत. त्याच्या नंतरच्या मुस्लीम धर्मसंस्थापक महंमद यांचीं कांही धर्मतत्त्वे पुरातन व सर्वसामान्य अशींच आहेत. मानवाच्या कोणत्याही कृतींत न्यून असणें संभवनीय आहे. तीं न्यूनें काढून टाकणेही आवश्यक आहे. पण त्यावरच भर देऊन एकाने दुसऱ्यास हिणविण्यापेक्षा सर्वांना समान अशा मानवी धर्मास उपयुक्त होतील अशाच तत्त्वांचा फैलाव करण्याचे प्रयत्न सामुदायिक रीत्या झाले पाहिजेत. तात्त्विक भूमिकेवर वादविवाद व विचार होणें मानवी प्रगतीस इष्ट आहे. तितकेच वैयक्तिक विरोध समाजास घातक आहेत. भारतांत निर्माण झालेल्या कोणत्याही धर्माने आम्हास असहिष्णुता शिकविली नाही. आम्हास स्वधर्माचा अभिमान आहे, स्वमताचा सदाग्रह आहे. पण त्याची दुसऱ्यावर सक्ति नाही. धर्म किंवा त्यांतील मतें हीं जुलूम जबरदस्तीने किंवा आमिषास भुलवून कोंबण्याच्या वस्तू नाहीत. तीं ग्रहण करण्यास आधीं मनाची शुद्धता असावी लागते. ज्याचे मन शुद्ध असते त्यास स्वधर्माविषयीं सक्रीय निष्ठा व परधर्माविषयीं आदर हीं असलींच पाहिजेत. आज आपल्या भारत देशांत योगायोगाने अनेक धर्म व पंथ

नांदत आहेत. अमक्याच धर्माचा किंवा पंथाचा पुरस्कार भारत सरकार करीत नसलें तरी प्रत्येक धर्मास, संरक्षण देण्यास तें बद्धपरिकर आहे. सर्वजातीसमानता या न्यायाने हें योग्यच आहे...."

या भाषणांत स्वामीजींनी केवळ सर्व धर्मांनाच स्थान असल्याचे प्रतिपादन केले असे नव्हे तर धर्म नाकारणाऱ्या नास्तिकांनाही आस्तिकाइतक्याच सन्मानाने नांदायचा अधिकार असल्याचें सांगितलें. ते म्हणाले, "धर्म, मग तो सनातन असो किंवा अर्वाचीन असो, परमतत्त्वाचे अस्तित्व मानतो असा सर्वसाधारण समज आहे. पण वैदिक धर्माचा इतिहास पाहिला तर कपिल-चार्वाका सारखे तत्त्वज्ञानी हे नास्तिकवादी होते. त्यांचा नास्तिकवाद खोडून टाकण्याचे प्रयत्नही झाले. पण त्यांचा कोणी अनादर केल्याचें किंवा तत्कालीन राजसत्तेकरवीं त्यांना शासन केल्याचें कोठेंच आढळत नाहीं. मतानें नास्तिक किंवा अज्ञेयवादी असलेले हे तत्त्वज्ञानीही सर्वसामान्य अशा मानवी धर्माचे पुरस्कर्तेच होते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यावरून बोध घेण्यासारखा आहे तो हा की या भारत देशांत नास्तिकवाद्यां विषयीं सुद्धां आदर बाळगिला जात होता, इतकेंच नव्हे, तर त्यांना समाजांत स्थानही देण्यांत येत होतें. हाच कित्ता आज आम्हास गिरवायचा आहे."

## तीन मठांच्या उभारणीची भव्य योजना

श्री द्वारकानाथतीर्थ स्वामीजींच्या कारकीर्दींत अविस्मरणीय ठरतील अशा असंख्य घटना घडल्या. त्यांतहि त्यानी महाराष्ट्र, कर्नाटक, आणि गोवा या तीन राज्यातील तीन महत्त्वाच्या शहरांमध्यें नव्याने निर्माण केलेल्या तीन मठांची उभारणी होय. तोंवर कोणत्याही आचार्यांनी तीन मठांची स्थापना आणि शिवाय पर्तगाळी मठाची सुधारणा अशा प्रचंड गोष्टी केल्याची नोंद नाही. मुंबई, बंगळूर आणि वास्को या तीन शहरांत गोकर्ण पर्तगाळी संस्थानचे तीन मठ बांधण्याची कल्पना त्या काळांत आर्थिक दृष्ट्या एवढी महत्त्वाकांक्षी होती कीं ती हातांत घेणें हें मोठे धाडस ठरणार होतें. पण श्रीद्वारकानाथतीर्थांनी ती हातात घेतली आणि अल्पावधींत पूर्ण केली. मुंबईचा एक मठ म्हणजे लाखों रुपयांची योजना ! खुद्द संस्थानकडे अशा जादा कार्यासाठी खर्च करायला निधि उपलब्ध नव्हता. अनुयायांकडून कितपत मदत मिळेल याची शंका. फक्त दोनच गोष्टी अनुकूल होत्या. त्या म्हणजे स्वामीजींची

दुर्दम्य इच्छाशक्ती आणि त्यांनी केलेला लोकसंग्रह. या दोन गोष्टींमुळेंच हीं प्रचंड कार्यें पूर्ण होऊं शकली.

## वडाळा मठाच्या उभारणीचा इतिहास

मुंबईला मुक्काम असताना एक दिवस स्वामीजींच्या मनांत आलें, मुंबई शहर हें सारस्वतांचे दुसऱ्या क्रमांकाचें केंद्र. या ठिकाणी मध्यवर्ती जागेंत संस्थानचा मठ असावा. पण संस्थानचा अधिपती कांही हुकुमशहा नव्हता. पीठाधिपतीच्या मनांत आलें आणि हुकूम दिला, अशी संस्थानची परंपरा नव्हती. महत्त्वाच्या गोष्टीचा अनुयायांच्या बैठकींत खल करून निर्णय घेणें ही संस्थानची परंपरा होती आणि त्यांतल्या त्यांत द्वारकानाथतीर्थ स्वामींची वृत्ती तर लोकशाहीची आणि लोकानुरंजनाची होती. त्यांनी मुंबईतील आपल्या सर्व संप्रदायांच्या सारस्वतांना बोलावून घेतलें व त्यांच्या समोर आपला विचार ठेवला. मुंबई सारख्या सारस्वतांची मोठी संख्या असलेल्या शहरांत स्वकीय समाजाच्या लग्न-मुंजीसारख्या व इतर सांस्कृतिक कार्यांना जागा नाहीं, संचाराच्या वेळीं आचार्यांना रहायला मध्यवर्ति ठिकाणी सोय नाहीं, वगैरे मुद्दे मांडून अशा एखाद्या सुयोग्य वास्तूची गरज असल्याचें प्रतिपादन केलें. उपस्थित सर्वांनी ही कल्पना उचलून धरली आणि एक इमारत समिती स्थापन करण्यांत आली.

मुंबईस्थित सारस्वतांच्या सर्व गटांना मठस्थापनेच्या निमित्ताने श्रीद्वारकानाथतीर्थांनी पहिल्या प्रथम एकत्र आणलें. जी बांधकाम समिति स्थापन केली त्यात मुंबईकर, वाडकर, गोवेकर, कर्नाटकी या सर्वांचाच समावेश केला. त्यांत बडे सरकारी अधिकारी होते तसे लहान मोठे व्यापारी होते. डॉक्टर, वकील होते, सामाजिक पुढारी, कार्यकर्ते..., सर्व थरांतल्या सारस्वत व्यक्ति एकत्र आल्यामुळे यावेळीं एकतेचें एक नवें वातावरण निर्माण झालें.

मठासाठी जागा निवडण्याचा प्रश्न पुढें आला तेव्हां मठ मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणीं असावा यावर एकमत झालें. पण गिरगांव सारख्या मुंबईच्या मध्यवर्ती भागांत जागा मिळणे कठीण होतें. वडाळाच्या जागेचा विचार झाला तेव्हां त्या ओसाड जागेंत मठ बांधायला अनेक मठानुयायी लोकांचा विरोध होता. पण मुंबई शहराचें केंद्र उत्तरेकडे झुकत आहे हें लक्षांत घेऊन स्वामीजींनी स्वतः ही जागा निवडली. चाळीस वर्षांपूर्वीची वडाळ्याची ती ओसाड जागा आज ओसाड राहिलेली

नसून दादर, वडाळा हा भाग आतां बृहन्मुंबईचे मध्यवर्ति केंद्र बनले आहे.

बांधकाम चालू केलें आणि इमारतीचा एक भाग पूर्ण होतांच शके १८७६ माघ शु. ९ मी, दि. २ फेब्रुवारी १९५५ रोजीं इमारतीचें मोठ्या थाटाने उद्घाटन करण्यांत आलें. काशी मठाचे पीठाधीश श्रीमत्सुधींद्रतीर्थ यांच्या हस्ते हें उद्घाटन झालें.

## वडाळा येथील श्रीद्वारकानाथ भवन

श्रीद्वारकानाथ भवन हें बृहन्मुंबईच्या मध्यभागीं असलेल्या श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठानुयायांचें एक प्रमुख सांस्कृतिक तथा धार्मिक केंद्र आहे. श्रीमठ परंपरेंतील बाविसावे गुरुस्वामी श्रीमद् द्वारकानाथतीर्थ यांच्या दूरदृष्टीमुळेंच ती वास्तू उभी होऊं शकली आणि एका प्रकारें ते भवन म्हणजे स्वामिजींच्या कर्तृत्वाचें व संघटनशक्तीचें मूर्तिमंत प्रतीकच आहे.

१९५० सालीं श्रीस्वामीजींचें वास्तव्य मुंबई शहरांत असताना शहरांत इतस्ततः विखुरलेल्या समाजाच्या विविध घटकांमध्ये सतत संपर्क राहिल्याशिवाय समाज संघटीत होऊं शकणार नाहीं हें लक्षांत येताच झपाट्याने विस्तारत चाललेल्या मुंबई शहरांत एक केंद्र उभारण्याची आवश्यकता त्यांना जाणवली. त्यांनी जातीने शहरांतील मोकळ्या उपलब्ध जागांची पहाणी करून वडाळा येथील श्रीहनुमान मंदिरासमोरचें मैदान निवडलें. जमीन ताब्यांत घेण्याचे सोपस्कार तत्परतेने पार पाडून स्वहस्तें दि. २२ डिसेंबर १९५० रोजीं भवन वास्तूचा शिलान्यास बसविला.

ठीक ५० महिन्यांत एक भव्य तीन मजली वास्तू उभी झाली आणि त्या वास्तूचें समाजाने मोठ्या अभिमानाने 'श्रीद्वारकानाथ भवन' असे नामकरण केलें. भवनाला जोडून एक सुरेख मंदिर उभारून तेथें श्रीराम प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यांत आली. एक प्रकारें वर्षानुवर्षे स्वामी दर्शनासाठीं ताटकळत राहिलेल्या भक्तश्रेष्ठ श्रीहनुमंताच्या हाकेला प्रभु रामचंद्र धावून आले. आज वडाळा येथील या दोन्ही मंदिरांतील स्वामी व भक्तांच्या प्रतिमा एकमेकांचे दर्शन घेत आहेत.

सध्या श्रीराम मंदिर हे मुंबई शहरांतील एक पवित्र धर्मस्थान मानलें जातें. मंदिरांतली नित्य पूजा व नैमित्तिक धार्मिक कार्यामुळे समाजाच्या विविध वर्गांतील हजारो स्त्रीपुरूष या ठिकाणी देवदर्शनाला येऊन मनःशांति प्राप्त करीत असतात.

श्रीद्वारकानाथ भवनाच्या मुख्य भागांत दोन सभागृहें आहेत. तळमजल्यावरील

विशाल सभागारांत विविध प्रकारचीं सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यें नित्यनेमाने होत असतात. विवाह, व्रतबंध सारखे सामाजिक संस्कार ह्याच सभागृहांत संपन्न होत असतात. परंतु विशेष प्रसंगी वरच्या मजल्यावरील आटोपशीर सभागृहही विविध कार्यासाठीं समाजाला उपलब्ध करून दिलें जातें. विविध मठांचे स्वामी ज्यावेळीं मुंबईत येत असतात तेव्हां तेही श्रीद्वारकानाथ भवनांतील व्यवस्थेचा लाभ घेत असतात.

श्रीस्वामीजींचे मुंबईत आगमन होत असते त्यावेळीं त्यांच्या निवासाची व्यवस्था वरच्या मजल्यावरच होत असते आणि त्या कालावधींत त्या सभागृहांत स्वामीजी शिष्य परिवाराच्या गांठीभेटी घेत असतात. या वास्तूंत समाजाच्या मुलांना शिक्षणास मदत करणारी जी. एस्. बी. स्कॉलरशिप लीग संस्था कार्यरत आहे.

श्रीद्वारकानाथ भवनांत विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांशिवाय शैक्षणिक व इतर सेवाकार्येंही चालविलीं जातात. श्रीद्वारकानाथ तीर्थ स्वामीजींनी स्थापन केलेली श्रीपूर्णप्रज्ञ संस्कृत पाठशाळा हे इच्छुकांना विनामूल्य गिर्वाण विद्येचें शिक्षण देणारें प्रमुख केंद्र आहे.

मोफत वैद्यकीय सेवा, धार्मिक सार्वजनिक श्रीगणेशोत्सव, सामुदायिक उपनयन संस्कार समारंभ, हळदीकुंकू ह्यासारखे कार्यक्रम ह्या भवनांत जसे होत असतात, त्याच प्रमाणें वार्षिक श्रीरामजन्मोत्सव हा नऊ दिवस चालणारा महोत्सव उल्लेखनीय आहे.

ह्या भवनाच्या वास्तूंत दि २७ फेब्रु. १९६७ रोजीं श्रीमठ इतिहासांतील एक ऐतिहासिक घटना घडली. त्या दिवशीं श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी शिष्य स्वीकार केला.

## धार्मिक व सांस्कृतिक केंद्र

मुंबईच्या मध्यभागी असलेले श्रीद्वारकानाथ भवन हें त्या महानगरांतील एक प्रमुख धार्मिक व सांस्कृतिक केंद्र बनून राहिलेले आहे. श्रीराम मंदिराच्या सान्निध्यामुळें परिसरांतील वातावरणांत नित्यशः देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वर्दळ तेथें असतेच, त्याशिवाय श्रीद्वारकानाथ सभागृह व श्रीमठाच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृह ही अनेक धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक स्नेहमेळाव्यासाठी अनुकूल



श्रृंगेरी मठाधीश अभिनव विद्याभारती तीर्थ जगद्गुरुंसमवेत (सन १९५६)

अशी स्थाने बनलेली आहे. श्रीगोकर्णपर्तगाळी जीवोत्तम मठाचे स्वामी मुंबईत असताना त्यांचे वास्तव्य याच मठांत होत असते आणि बृहद् मुंबईत वास्तव्य करून राहणाऱ्या मठानुयायी वर्गाला व इतर भाविकांना श्रीगुरुदर्शन घेण्याची, त्यांच्या प्रासादिक प्रवचनाचे श्रवण करण्याची आणि त्यांचे आशीर्वाद प्राप्त करण्याची ती एक दुर्मिळ संधि असते. या मठांत इतर मठांचे स्वामीजी देखील आग्रहाने वास्तव्य करीत असतात. चौफेर विस्तारलेल्या मुंबई महानगरीतील इतस्ततः विखुरलेल्या भक्तजनांशीं संपर्क ठेवण्याच्या दृष्टीने वडाळा येथील श्रीद्वारकानाथ भवन हे त्यांना अनुकूल केंद्र वाटल्यास आश्चर्य नाहीं.

याच पवित्र मठवास्तूंत श्रीद्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींनी आपल्या शिष्याला आश्रमदीक्षा दिली. तो समारंभ मुंबई नगरींतील गौड सारस्वत ब्राह्मण समाजासाठी अभूतपूर्व असा सोहळा होता. किंबहुना शिष्य स्वीकार सोहळ्यांत इतर समाजानेहि हार्दिक सहभाग घेतल्यामुळें एका अन्यथा धार्मिक कार्याला सामाजिक उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.

या सोहळ्यांत देशाच्या सर्व भागांतील मठानुयायांचे प्रतिनिधी सहभागी झाले. शंभराहून अधिक वैदिकांच्या सामुदायिक वेदघोषाने व मंत्रांच्या पठणाने वातावरण अंत्यत प्रसन्न व तितकेच गंभीर झाले होते. दि. २४ फेब्रुवारी १९६७ रोजी प्रार्थनेने

सुरू झालेल्या या सोहळ्याची सांगता दि. २७ फेब्रुवारी १९६७ रोजीं दिग्विजयोत्सवाने झाली. या सोहळ्याच्या निमित्ताने श्रीद्वारकानाथतीर्थांनी केलेलीं भावपूर्ण प्रवचने ज्यांनी ऐकलीं, ते अजूनहि त्या प्रासादिक प्रवचनांचे स्मरण करीत असतात.

## बेंगलोर येथें मठस्थापना

मुंबईच्या मठाचें शेष बांधकाम नंतर ५-६ वर्षांच्या कालावधींत पूर्ण झालें आणि स्वामीजींचें स्वप्न त्यांच्या इच्छेनुसार साकार झालें. पण तेवढ्यावर ते स्वस्थ बसले नाहींत. महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटकाच्या राजधानींतही आपला मठ असायला हवा ही त्यांची आणखी एक महत्त्वाकांक्षा होती. या कामाला ते तावडतोब लागले. बेंगळूर शहरांतील बसवनगुडी भागांत कृष्ण राजेंद्र रोडवर एका इमारतीसह त्यांनी त्या ठिकाणीं जागा खरेदी केली. मागाहून श्रीमद् विद्याधिराजतीर्थांनी एक भव्य टोलेजंग मठवास्तू तेथें उभारलेली असून आज तें बेंगळूर मधील प्रमुख सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक केंद्र बनलें आहे.

## पर्तगाळ मठावर सुवर्ण कलश

या मठाच्या निर्मितीशिवाय खुद्द पर्तगाळ मठांत जीर्णोद्धाराचीं कांही कामें स्वामीजींनी हातीं घेतलीं. श्री रामदेव मंदिराचा घूड जीर्ण झाला होता. त्याचा जीर्णोद्धार करून सबंध छप्परावर त्यांनी तांब्याचा पत्रा बसवून घेतला आणि शिखरावर सुवर्णकलश बसविला. हें काम पूर्ण झाल्यावर शके १८८७, विश्वावसु संवत्सर, माघ १५, दि. ५ फेब्रुवारी १९६६ रोजीं श्री राम, सीता व लक्ष्मण या मंदिरांतील त्रिमूर्तीची पुनःप्रतिष्ठा केली. पुनःप्रतिष्ठेचा हा कार्यक्रम पांच दिवसपर्यंत चालला होता.

## डिचोली येथील श्रीव्यासाश्रम

पर्तगाळ मठाची मुख्य वास्तू गोव्याच्या दक्षिण टोकावरील काणकोण महालांत असल्याने उत्तर गोव्यांतील व गोव्याच्या सरहद्दी पलिकडे दक्षिण कोकणांतील मठानुयायी वर्गाला मठाशीं संपर्क साधणे दुर्लभ झाले होते. त्या परिसरांतील शिष्य

परिवार स्वामीजींनी आपल्या भागाचा दौरा करावा यासाठीं सतत श्रीस्वामीजींकडे विनंतीअर्ज पाठवीत होता. पण कार्यबाहुल्यामुळें आणि इतर अनुकुलतेच्या अभावीं तो योग जुळून येत नव्हता. त्या परिसराशीं संपर्क ठेवण्याच्या दृष्टीने डिचोली (भतग्राम) येथील व्यासाश्रम असें नामकरण केलेल्या मठवास्तूची डागडुजी करून त्या ठिकाणीं एखादी प्रवृत्ती सुरू करण्याचा संकल्प श्रीद्वारकानाथतीर्थांनी सोडला. धर्म-संस्कृतीच्या रक्षणाच्या दृष्टीने तसेच सत्पात्र वैदिक व पुरोहित यांची परंपरा अखंड चालू ठेवण्याच्या इराद्याने संस्कृत पाठशाला त्या ठिकाणीं स्थापन करण्याचे ठरविलें. धर्माचें योग्य ज्ञान समाजाला द्यावें आणि धार्मिकतेची जोपासना करणारा वर्ग तयार व्हावा या दृष्टीने कालोचित सुव्यवस्थित स्वरूपांतील संस्कृत पाठशाळा आवश्यक आहे असे विचार श्रीस्वामीजींनी आपल्या शिरदोन येथील वास्तव्यांत गोव्याच्या विविध भागांतील मठानुयायी वर्गाच्या बैठकीत व्यक्त केले. डिचोलीसारखे मध्यवर्ति स्थान, व्यासाश्रमाचें प्रशांत वातावरण, श्रीमद् अणुजीवोत्तमतीर्थांच्या वृंदावनाने पावन झालेल्या वास्तूंत असलेलें श्रीलक्ष्मीनारायण दैवताचे सान्निध्य, इत्यादि गोष्टींचा विचार विनिमय होऊन डिचोली येथेंच पाठशाळा सुरू करण्याचा निर्णय त्या बैठकींत घेण्यांत आला. त्यांतहि ऐतिहासिक कागदपत्रांवरून वैष्णवमत प्रतिष्ठापनाचार्य श्रीमन्मध्वाचार्य यांच्या पादस्पर्शाने सदर परिसर पुनीत झालेला असल्याचे आढळून आल्याने ती जागा विशेष करून पसंत करण्यांत आली.

या संदर्भात डिचोली येथील श्रीव्यासाश्रमाच्या संस्थापनेची पार्श्वभूमि कथन करणे अप्रस्तुत ठरूं नये.

श्रीमठ परंपरेंतील पांचवे स्वामी श्रीअणुजीवोत्तमतीर्थ हे श्रीशके १५१० (इ. स. १५८८) मध्ये श्रीगुरुपीठावर आले आणि शके १५५९ (इ. स. १६३७) मध्यें डिचोली येथें त्यांनी देह ठेवला. गौड सारस्वत समाजाच्या इतिहासांतील तो वाताहतीचा काळ होता. पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी गोव्याच्या भूमींत एका हातांत क्रूस व दुसऱ्या हातांत बंदूक घेऊन उच्छाद मांडला होता. त्यावेळीं धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठीं सारस्वत समाजाने आपल्या देवदैवतांसह सुरक्षित स्थानीं स्थलांतर केलें. डिचोली कसबा त्यावेळी आदिलशाही सत्तेखालीं होता. दगडापेक्षां वीट मऊ या नात्याने सासष्टींतून स्थलांतर केलेल्या या सारस्वत कुटुंबांनी डिचोलीच्या एका वाड्यावर तात्पुरते निवास उभे केले. सासष्टीहून आलेल्या या लोकांनी त्या वाड्याला 'सास्टीवाडो' असें नांवहि दिलें. या स्थलांतरित समाजाशीं संपर्क प्रस्थापित करून त्यांना स्थैर्य

कसें प्राप्त करून देतां येईल याचा विचार करण्यासाठीं मठाधिपति श्रीअणुजीवोत्तम यांनी त्या भागाचा संचार केला. लोकांना धर्मोपदेश करून कठीण परिस्थितीचा कसा मुकाबला करावा याबद्दल मार्गदर्शन केलें. त्याच मुक्कामांत कार्तिक वद्य सप्तमीच्या दिवशीं ते वृंदावनस्थ झाले. मागाहून त्या वृन्दावनाचा जीर्णोद्धार करण्यांत आला आणि सभोवतीं एक अग्रशाळा बांधण्यांत आली. याच मठवास्तूंत श्री शके १८२७, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, गुरुवार (१५-६-१९०५) रोजीं श्रीमठ परंपरेंतील विसावे गुरुस्वामी श्रीमदिंदिराकांततीर्थ यांनी श्रीलक्ष्मीनारायण मूर्तीची विधिवत् प्रतिष्ठापना केली.

अशा ऐतिहासिक वास्तूमध्यें संस्कृत पाठशाळा सुरू करण्याचा निर्णय श्रीद्वारकानाथतीर्थांनी घेतला. मठवास्तूचा बराच ऱ्हास झाला होता. श्रीस्वामीजींच्या आदेशाने स्थानिक लोकांचें एक व्यवस्थापन मंडळ नियुक्त करून वास्तूचा प्रथम जीर्णोद्धार करण्यांत आला. नंतर आचार्यांची निवड, अभ्यासक्रमाची आंखणी, आदि कामें पूर्ण करण्यांत आलीं. विद्वद्वर्य वेदमूर्ति वासुदेव दत्तात्रय निगुडकर यांची पाठशाळेच्या प्राचार्यपदीं नियुक्ति करण्यांत आली आणि बारा वर्षांचा योजनाबद्ध अभ्यासक्रम आंखण्यांत आला. धर्मशास्त्राबरोबरच अर्वाचीन भारतीय भाषांचें ज्ञान विद्यार्थ्याला मिळेल याची तरतूद करण्यांत आली. बौद्धिक अभ्यासाशिवाय कृषिकर्म व गोपालन या आश्रमीय जीवनाच्या अंगांना योग्य स्थान देण्यांत आलें. शिवाय ज्योतिष, आयुर्वेद, संगीत व हस्तकला व्यवसायांचेंही प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यांत आली. अखेर श्रीशके १८७५ या विजय संवत्सरांत ज्येष्ठ वद्य पंचमीच्या दिवशीं श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींच्या हस्तें पाठशाळेचें रीतसर उद्घाटन करण्यांत आलें आणि तिला 'श्रीमद् इंदिराकांततीर्थ संस्कृत पाठशाळा' असें नांव देण्यांत आलें.

त्या संवत्सरांत डिचोली मठवास्तूंत श्रीद्वारकानाथतीर्थांनी चातुर्मास व्रताचरण केलें. दहा वर्षेपर्यंत ही पाठशाळा डिचोलींत चालली. परंतु नंतर व्यावहारिक अडचणी लक्षांत घेऊन आणि पाठशाळेच्या व्यवस्थेवर आपली प्रत्यक्ष देखरेख रहावी या दृष्टीने स्वामीजींनी पाठशाळा पर्तगाळ मठांत स्थलांतरित केली. आज ही देशांतील एक अशा प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण व प्रगत पाठशाळा मानली जाते.

# राजकीय परिस्थितीचा ताण

श्री स्वामीजींच्या कारकीर्दीचा तीस वर्षांचा काळ धार्मिक व सामाजिक दृष्ट्या शांततेचा होता, पण राजकीय दृष्ट्या मात्र तो फार अस्वस्थतेचा होता. ही राजकीय अशांतता, अस्वस्थता व अनिश्चित भवितव्यता, गोव्याबाहेर व गोव्यांत दोन्ही ठिकाणीं चालू असलेली युद्ध-कालीन परिस्थिती, भारताला झालेली स्वराज्य प्राप्ती, गोव्यांत स्वातंत्र्यासाठी चाललेले आंदोलन, त्यांतून उद्‌भवलेले भारत-पोर्तुगाल सरकार मधील वितुष्ट, नंतरची माल वाहतूक बंदी व प्रवासबंदी या सर्व गोष्टींचा श्रीगोकर्ण-पर्तगाळ मठाचा आर्थिक कारभार व अनुयायांकडील-संपर्क आदि गोष्टींवर विपरीत परिणाम झाला होता. एक प्रकारे संस्थानला एका मोठ्या दिव्यांतून जावें लागलें. गोकर्ण मठाचे अनुयायी फक्त गोव्यांतच नव्हे, तर गोव्याबाहेर कर्नाटक व महाराष्ट्रांतही लाखोंच्या संख्येने आहेत. संस्थानचे जे अनेक मठ गोव्याबाहेर आहेत, त्यांच्याशी संपर्क साधणे कठीण होऊन बसले. संचारासाठी पूर्वीप्रमाणे सुलभपणे सर्वत्र हिंडणे अवघड झाले.

या प्रतिकूल परिस्थितींतही स्वामीजींनी संस्थानचा कारभार मोठ्या कुशलतेने चालविला. आर्थिक तूट येत होती; पण कांहीं ठिकाणीं त्यांनी जमीन विकत घेतली व कांहीं दान म्हणून घेतली. गुरुस्वामींच्या कारकीर्दीतील संख्येपेक्षा ही संख्या कमी होती खरी; परंतु संस्थानच्या योगक्षेमाकडे श्रीद्वारकानाथतीर्थांनी दुर्लक्ष न करतां जिद्दीने प्रयत्न केला.

आपल्या कारकीर्दीत श्रीस्वामीजींनी देशांतील सर्व प्रमुख तीर्थस्थानांची यात्रा करून देवदर्शन व तीर्थस्नान केलें. त्याचप्रमाणे देशांत इतस्ततः विखुरलेल्या सारस्वत समाजाशीं संपर्क साधून श्रीगुरुपीठाकडील त्यांचा विच्छेदित संबंध पुन्हा प्रस्थापित केला. त्यामुळें समाजांत नवें चैतन्य निर्माण होऊन निद्रिस्त अस्मितेला जाग येऊं शकली आणि सामाजिक तथा सांस्कृतिक स्तरावर समाज संघटनेची प्रक्रिया कार्यरत झाली. जेथें जेथें श्रीस्वामीजींनी संचार केला तेथें तेथें समाजाने गुरुवर्यांचें आदर-भक्तीने उत्स्फूर्त स्वागत केलें.

त्यावेळीं गोव्यांतील परिस्थिती मात्र विचित्र होती. स्वातंत्र्य आंदोलनाला विलक्षण वेग आल्यामुळे स्थानिक समाज संघटित होऊन उठाव करील अशी भीति राज्यकर्त्यांना वाटत होती. परंतु त्याचबरोबर राज्यकर्त्यांना हिंदूंचा रोष ओढवून

घ्यायचा नव्हता. अशा वातावरणांत गोव्याची राजधानी असलेल्या पणजी शहरांतील लोकांनी श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींना पणजींत अल्प मुक्काम करून समाजाला मार्गदर्शन करण्याची विनंती केली आणि श्रीस्वामीजींनी ती तत्काळ स्वीकारली.

## पणजीतील ऐतिहासिक स्वागत सोहळा

दि. ३१ जानेवारी १९६० रोजीं बेतीं येथून एका खास फेरीबोटींतून रोषणाई, मंगलवाद्यें आणि शिष्य परिवाराच्या जयजयकाराच्या घोषणा यांनी प्रफुल्लित झालेल्या वातावरणांत श्रीस्वामीजी पणजी शहरांत उतरले तेव्हां प्रचंड जनसमुदायाने त्यांचें भव्य हार्दिक स्वागत केलें. पोर्तुगीज पोलिसांची कुमक सावधगिरीचा उपाय म्हणून बाजूला उभी होती. परंतु शिष्य परिवाराच्या स्वयंसेवक पथकाने चोख व्यवस्था ठेवल्यामुळे कोणताच अनुचित प्रकार घडला नाहीं.

पणजीच्या भूमीला श्रीस्वामीजींच्या मंगल चरणांचा स्पर्श झाला आणि ग्रामस्थांनी वीस गर्नाल पेटवून फटाक्यांच्या अखंड गडगडाटांत श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीशांचें स्वागत केलें. तो प्रसंग अविस्मरणीय होता. पोर्तुगीज अमदानींत गोव्याच्या राजधानींत एका धर्मगुरूचा झालेला तो पहिलाच भव्य दिव्य असा स्वागत सोहळा होता. एकप्रकारें पणजीकरांच्या सुप्त भावना त्यांतून व्यक्त होत होत्या. आनंद व उत्साहाला उधाण आलें होतें. पश्चिमेकडे अस्तंगत होत चाललेल्या सूर्यनारायणाच्या साक्षीने ज्यांनी तो सोहळा पाहिला, त्यांच्या डोळ्यांचे पारणें फिटलें. आजहि त्या प्रसंगाचें वर्णन पणजीकर मोठ्या अभिमानाने व सश्रद्ध अंतःकरणाने करतात.

चार पावलें पायीं चालून समोर उभ्या असलेल्या विजयरथावर श्रीस्वामीजींनी आरोहण केलें. विद्युत् दीप माळांनी सुशोभित व पुष्पालंकारांनी सजविलेल्या चार अश्वांच्या या विजयरथावर श्रीद्वारकानाथतीर्थ आरूढ झाले आणि चौफेर उभ्या असलेल्या जनसमुदायाकडून अभिवादनाचा स्वीकार केला. जयजयकाराच्या निनादाने अवघी पणजी दुमदुमली आणि तेथूनच मिरवणूक सुरू झाली. या सवाद्य मिरवणुकींत आबालवृद्ध पणजीकरच नव्हे, तर इतर भागांतील भक्तजनहि गुरुदर्शनासाठीं आले होते. प्रसन्नवदनी गुरुवर्यांचें दर्शन घेऊन त्यांनी जी कृतार्थता अनुभवली व जी उत्स्फूर्त जयजयकाराची घोषणा दिली, त्या घोषांपुढे वाद्यांचें संगीत फिकें पडलें. प्रत्येक दुकानापुढें, प्रत्येक घरासमोर मंगलारती व पुष्पहार स्वीकारीत अनेक सरकारी

कचेऱ्यांसमोरून विजयरथ दिमाखाने चालला. अनेक ठिकाणीं सरकारी कार्यालयांतर्फे देखील गुरुवर्यांना मंगलारती व पुष्पहार अर्पण करण्यांत आले. मिरवणुकीचें आगमन श्रीमहालक्ष्मी मंदिरांत होईपर्यंत रात्रीचे १०-३० वाजले. नंतर तेथें पाद्यपूजा नि स्वागत समारंभ पार पडला.

सामान्य परिस्थितींत एका प्रमुख पीठाधिशाच्या स्वागत सोहळ्याला असते तेवढे महत्त्व पणजींतील या नेत्रदीपक कार्यक्रमाला हमखास मिळालें. पण गोव्यांतील तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या संदर्भांत धर्मशक्तीचें तें अपूर्व प्रदर्शन होतें. लोकशक्ती व धर्मशक्तीच्या त्या विराट दर्शनाने पोर्तुगीज राज्यकर्त्यांना थोडेंसें अस्वस्थ केलें.

या प्रसंगीं केलेल्या आशीर्वचनपर भाषणांत श्रीद्वारकानाथतीर्थांनी आपले परमगुरु परमपूज्य श्रीइंदिराकांततीर्थ यांचें पणजी शहरांत जें भव्य स्वागत झालें होतें त्याचें स्मरण केलें आणि सर्व जातिधर्माच्या लोकांनी या सोहळ्यांत भाग घेतला याबद्दल संतोष व्यक्त केला. जाति-जातिमध्यें व धर्मा-धर्मामध्यें प्रेम, सलोखा व सहकार्य असावें आणि मानवतेच्या एकतेद्वारेच भावी काळाचें मांगल्या टिकून राहील असें सांगितलें.

## वेंगुर्ले येथें नागरी सत्कार

श्रीद्वारकानाथतीर्थांनी देशाच्या सर्व भागांमध्ये मुक्त संचार करून सारस्वत समाज संघटनेच्या प्रक्रियेला चालना दिली. अनेक विद्वज्जनांच्या सभासंमेलनांमध्ये भाग घेऊन आपल्या विद्वत्तापूर्ण व प्रासादिक शैलींतील रसाळ प्रवचनांनी लोकहृदयें जिंकलीं. नव्या युगांत धर्मशास्त्रांची उपयुक्तता समजावताना मानवते-बद्दलचा त्यांच्या मनांतील अकृत्रिम कळवळा पाहून सारस्वत संप्रदायाचेच नव्हे तर इतर ज्ञातिधर्माचे लोकहि श्रीस्वामीजींकडे अत्यादराने पाहूं लागले. जेथें जेथें श्रीद्वारकानाथतीर्थ गेले, तेथें तेथें त्यांच्या वांट्याला भव्यदिव्य सत्कार आले. त्यांतील वैशिष्ट्यपूर्ण सत्कार १९ नोवेंबर १९५७ रोजीं वेंगुर्ला नगरींत घडला. विज्ञानयुगांत धार्मिक विचारांचें महत्त्व प्रतिपादणाऱ्या आणि भौतिक विकासाला आध्यात्मिक मूल्यांची जोड देणाऱ्या या यतिवर्यांचा वेंगुर्ला नगरपालिकेने भव्य नागरी सत्कार घडवून आणला.

१९५३ सालीं पोर्तुगालचे वसाहतमंत्री मानुएल सार्मेतु रुद्रीगिश गोव्याला

## पोर्तुगीज सरकार व पर्तगाळ मठ

आले तेव्हा त्यांनी पर्तगाळ मठाला आवर्जून भेट दिली होती व मठाविषयींची सर्व माहिती मिळविली होती. पोर्तुगालला परत गेल्यावर त्यांनी २३ जानेवारी १९५४ रोजीं लिस्बनहून एक 'देक्रेत' काढून कवळें व गोकर्ण-पर्तगाळ मठाचे स्वामी हे त्या त्या धार्मिक मठांचे प्रतिनिधी असून त्यांच्या मूर्ती, मानचिन्हे व पूजाअर्चेस लागणारें सामान आयात केल्यास त्यांस जकात लागू करूं नये असा हुकूम दिला.

गोव्यांत शेवटचे गवहर्नर व्हासालु इ सील्व्ह यांची कारकीर्द चालू झाली तेव्हां हिंदूंना व त्यांच्या धर्माला जाचमुक्त बरे दिवस आले. पोर्तुगीजांची सत्ता दृढ करण्याच्या हेतूने का असेना, त्या गव्हर्नरने हिंदूंच्या शिक्षण संस्थांना व धर्मसंस्थांना आर्थिक व अन्य प्रकारची मदत देण्यास प्रारंभ केला. त्यांच्या कारकीर्दीत धर्मपीठांना तीन सवलती मिळाल्या त्यांची नोंद आवश्यक आहे.

दि. १९-११-१९५९ रोजीं गव्हर्नरने एक दिप्लोम लेजिस्लातीव्ह प्रसिद्ध करून कोंफ्रारी, देवस्थान, मठ व मशिदी यांच्या जमिनींचें आणि त्यांतील घरांचें उत्पन्न फक्त पूजाअर्चादि कृत्यांत खर्च होत असल्यास त्यांना प्रेदियाल म्हणजे जमीन महसूल लागू करूं नये असा हुकूम काढला.

दि. १० नोव्हेंबर १९६० रोजीं पोर्तुगीज पोलीस खात्याचे मुख्याधिकारी यांनी श्रीगोकर्ण-पर्तगाळ मठाधिशांस गोव्याच्या हद्दींत प्रवेश करताना सर्व प्रकारच्या सोयी द्याव्यात असा सरहद्दीवरील पोलीस अधिकाऱ्यांस हुकूम दिला.

दि. २७-११-१९६० या दिवशीं खुद्द गव्हर्नर जनरलने हुकूम काढून पर्तगाळ व कवळे मठाच्या स्वामींस ते गोव्यांत प्रवेश करताना किंवा स्वतःच्या मठांत असताना कोणत्याही प्रकारच्या लसी टोचूं नयेत असा आरोग्य खात्यास कायम स्वरूपाचा आदेश दिला.

## राष्ट्रपतींकडून गौरव

श्रीद्वारकानाथतीर्थ यांची कीर्ति देशांत सर्वत्र इतक्या झपाट्याने पसरली कीं श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठीं येणाऱ्या भक्तगणांची संख्या सतत वाढूं लागली. श्रीस्वामीजींचे मंगल चरण आपल्या वास्तूला लागावे आणि त्यांच्या कृपाशिर्वादाने आपलें व परिवाराचें क्षेमकुशल व्हावें ही भावना मनांत बाळगून सामाजिक, औद्योगिक,

सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रांतील अग्रणी लोक देखील श्रीस्वामीजींच्या दर्शनास येऊं लागले. अशा लोकांमध्ये भारताचे पहिले राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांचाहि समावेश होता.

राष्ट्रपति श्रीस्वामीजींच्या दर्शनासाठीं आले आणि त्यांच्यांत जो अनौपचारिक संवाद झाला त्यामुळे श्रीस्वामीजींची विद्वत्ता, विवेकबुद्धि व व्यवहारकुशलता पाहून अत्यंत प्रभावित झाले व त्यांनी श्रीद्वारकानाथतीर्थांचा यथोचित गौरव केला.



राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामीजींकडून फलमंत्राक्षता घेताना.
छायाचित्रात राष्ट्रपतींचे निज-सचिव श्री. ए. व्ही. पै हेही दिसत आहेत.

स्वामीजींच्या दर्शनासाठीं नित्यशः अनेक मान्यवर येतच होते. त्याशिवाय देशाच्या विविध भागांमध्ये विविध समाजांमध्ये संचार करून श्रीस्वामीजी अशांत मनाला शांतता प्रदान करीत होते.

(स्वामीजींच्या संचाराची, तसेंच त्यांच्या सत्कारांची, त्यांच्या भेटीला आलेल्या मान्यवरांची एक संक्षिप्त यादी परिशिष्टांत जोडलेली आहे.)

## गोवा-मुक्ती नंतर

१९६१ मध्ये गोवा मुक्त झाल्यावर गोव्यांत धर्मावर असलेलीं बंधने आपोआप संपुष्टांत आलीं. सर्व धर्म समान असल्याचें संविधानातील तत्त्व गोव्याला लागू झालें. ख्रिश्चन धर्माचे राजकीय वर्चस्व गेलें. स्वामीजींनी अनेक नवे संकल्प सोडले. पर्तगाळी येथें एखादे महाविद्यालय सुरू करण्याच्या जुन्या विचाराला त्यांनी पुन्हा चालना दिली. परंतु दुर्दैवाने राज्यकर्त्यांच्या संकुचितपणामुळें पुन्हा अडचणी आल्या.

## शिष्यस्वीकार

स्वामीजींना बराच काळ अनारोग्याने ग्रासलें होतें. तशी त्यांची अंगकाठी मजबूत होती, देह सतेज होता. पण त्यांच्या पाठीच्या कण्याला दुखापत झाली होती. फार वेळ बसवत नव्हतें. आडवे पडूनच व्यवहार करावे लागत. आल्या गेल्याची चौकशी करण्यांत, त्यांचे क्षेमकुशल विचारण्यांत, विद्वान पंडितांचें आदरातिथ्य करण्यांत, संस्थानच्या कारभाराविषयीं बोलणीं करण्यांत, प्रवचनें-व्याख्याने करण्यांत त्यांची खूप शक्ती खर्च होई. हे श्रम कमी व्हावेत म्हणून त्यांनी शिष्यस्वीकार करावा अशी विनंती मठाचे अनुयायी त्यांस करीत असत. श्रीशके १८८८ च्या माघ वद्य द्वितीया (इ.स.१९६७) रोजीं मुंबईला वडाळा मठांत गंगोळी येथील एका बटूस, जे गुरुस्वामींचे पूर्वाश्रमींचे पुतणे होते, त्यांना आश्रम दिला व त्यांचें श्रीविद्याधिराजतीर्थ असें नामकरण केलें. गुरुस्वामींच्या देखरेखीखालीं त्यांचें अध्ययनही यथांसांग चालेल याची दक्षता घेतली.



संन्यासदीक्षा घेतल्यानंतर शिष्य श्रीविद्याधिराजतीर्थ गुरुवर्य श्रीद्वारकानाथतीर्थांची पाद्यपूजा करीत असताना.

## शिष्याची निवड

परंपरेचे बाविसावे आचार्य श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामी यांचे शिष्य श्रीविद्याधिराजतीर्थ आज मठाच्या गादीवर विद्यमान आहेत. हे गंगोळी येथील सेनापूर लक्ष्मीनारायण आचार्य व त्यांच्या पत्नी सौ. श्रीमतीबाई यांचे द्वितीय सुपुत्र. पूर्वाश्रमीचें नांव राघवेंद्र. श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींचे पूर्वाश्रमींचे पुतणे. त्यांना संस्थानच्या मुंबई येथील वडाळा मठांत शके १८८८, माघ वद्य २, दि. २६ फेब्रुवारी १९६७ या

दिवशीं मोठ्या थाटाने संन्यास दीक्षा देण्यात आली.

श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींचे ते पूर्वाश्रमीचे पुतणे म्हणून शिष्यस्वामीसाठीं ही निवड झाली अशांतला भाग नव्हे. शिष्यस्वामी निवडण्याची मठाची जी एक परंपरागत पद्धत आहे, त्या पद्धतीनुसार ही निवड करण्यांत आली. प्रथम गुरुस्वामींनी सात संभाव्य बटूंची शिष्यस्वामीसाठीं निवड केली व त्यांच्या पत्रिका गोळा करून त्या कांही ज्योतिर्विदांच्या स्वाधीन केल्या. या ज्योतिषपंडितांना स्वामीजींनी मुद्दाम मठांत पाचारण करून आणले होते. त्यांच्या स्वाधीन फक्त पत्रिकाच केल्या होत्या; त्या पत्रिका कोणाच्या आहेत हें पंडितांना सांगितलें नव्हतें.

ज्योतिषशास्त्रज्ञांनी सातही कुंडल्यांचा अभ्यास करून संन्यासाश्रमासाठीं सर्वांत योग्य अशा एका पत्रिकेची निवड करून ती श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींच्या स्वाधीन केली व मग श्री स्वामींनी ती राघवेंद्र आचार्य या बटूची असल्याचें सांगितलें. या प्रसंगीं स्ववर्गीय अनेक शिष्यमंडळी उपस्थित होती. त्यांनी या घटनेचे स्वागत केले. मागाहून बटूच्या मातापित्याकडे कांही सद्‌गृहस्थांचें एक शिष्टमंडळ पाठविण्यांत आलें व घडलेली हकीकत या मंडळीनें आचार्यांस निवेदन केली. त्यांनी व त्यांच्या पत्नीने नियम-कर्तव्यावर लक्ष देऊन बटूला शिष्याश्रम स्वीकारण्यास मान्यता दिली. त्यानंतर ही वार्ता सर्वत्र पसरली व बटूच्या निवडीबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केलें. यथाकाळीं वडाळा मठांत त्यांस आश्रम देण्यांत येऊन त्यांचें नूतन-आश्रमांतील नांव श्रीविद्याधिराजतीर्थ असें ठेवण्यांत आलें.

## विद्या व भाषांचें अध्ययन

गुरुस्वामींचा सहवास शिष्यस्वामींना पूर्ण सहा वर्षांहून अधिक काळ लाभला. या काळांत गुरुस्वामींनी आपल्या शिष्याच्या अध्ययनाकडे संपूर्ण लक्ष तर दिलेंच, शिवाय त्यांची दृष्टी अधिक विशाल व्हावी, ती समाजाभिमुख व्हावी, आधुनिक विद्या व शास्त्रांचे त्यांस ज्ञान व्हावें, तसेच अध्यात्म, तत्त्वज्ञान, वेदवेदान्त वगैरे शास्त्रांतही ते पारंगत व्हावे या दृष्टीने तरतूद केली. स्वतःबरोबर त्यांनी त्यांस सर्वत्र हिंडविले. मुळांतच श्रीविद्याधिराजतीर्थ यांस कन्नड व इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला होताच. कोंकणी ही मातृभाषा. मराठी व हिंदी भाषांचें ज्ञानही त्यांनी संपादन केलें. या सर्व भाषांवर प्रभुत्व संपादन केलेले श्रीविद्याधिराजतीर्थ हे बहुभाषा कोविद आहेत. पट्टाभिषेक समारंभानंतर झालेलें त्यांचें आशीर्वादपर भाषण हें त्यांचें पहिलें



शिष्यस्वीकार समितीच्या सदस्यांसमवेत गुरुवर्य श्रीद्वारकानाथतीर्थ तथा शिष्य स्वामी श्रीविद्याधिराजतीर्थ

जाहीर भाषण होतें. त्या भाषणाचें श्रवण केलेले अनेक भक्तगण त्यांचें वक्तृत्व, त्यांची बुद्धिमत्ता पाहून थक्क झाले.

## पट्टाभिषेक समारंभ

श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामींचे २५ मार्च १९७३ रोजी आकस्मिक निर्याण झाल्यानंतर दहा दिवसांनी, शके १८९५ चैत्र शुद्ध २, दि. ५ एप्रिल १९७३ रोजीं शिष्यस्वामींस पट्टाभिषेक करण्यांत आला. सर्व गोव्यांतून, मुंबईहून आणि कर्नाटकांतून असंख्य शिष्यवर्ग त्या दिवशीं पर्तगाळी मठांत गोळा झाला होता.

शिष्यस्वामीचा स्वीकार केल्यावरही श्रीद्वारकानाथतीर्थांच्या संचार कार्यक्रमांत खंड पडला नव्हता. गोमंतक मुक्तिनंतर तर ते अधिकच उत्साहाने काम करूं लागले. पण शरीर साथ देईनासें झालें.

श्रीविद्याधिराजतीर्थ ज्या दिवशीं श्रीगुरुपीठावर विराजमान झाले तो दिवस योगायोगाने श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाच्या संस्थापनेचा वर्धापन दिवस होता. आपल्या पहिल्याच प्रकट प्रवचनांतून त्यांनी शिष्य परिवाराचीं हृदयें

जिंकलीं. कुशावती तीर्थावरील जी पुण्यपुरातन मठवास्तु आहे, त्या परिसरांत निनादलेले त्यांच्या प्रवचनाचे मधुर ध्वनि शिष्य परिवाराच्या हृदयवीणा झंकृत करून गेले. आधुनिक जगाशीं सुसंवाद राखून समाजाला ऐहिक अभ्युदयाचा व परमार्थिक सुखाचा मार्ग दाखविण्याचें पांच शतकांचें अखंड कार्य श्रीमठाकडून यापुढेंहि चालू राहील असा विश्वास मठानुयायी वर्गाच्या मनांत दृढ झाला. गेल्या पांच शतकांच्या परंपरेचा आढावा घेतल्यानंतर श्रीविद्याधिराजतीर्थांच्या नेतृत्वाखालीं श्रीमठाला अधिक स्थैर्य मिळून त्याची कीर्ति अधिक उत्तुंग होईल याबद्दल संदेह राहिला नाहीं.

श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजी चैत्र शु. २ या शके १८९५, दि. ५ एप्रिल १९७३ रोजीं श्रीगुरुपीठावर आले आणि तेव्हांपासून मठाचें कार्य अधिकाधिक गतिमान व जीवनमुल्यांना पोषक बनविण्यासाठीं त्यानी असंख्य योजनाबद्ध उपक्रम हातीं घेतले. समाजधारणोन्मुख संन्यस्त वृत्तीची परंपरा चालू ठेवण्याचें व्रत घेऊन पीठस्थ झाल्या पासून श्रीविद्याधिराजतीर्थांनी शिष्यपरिवाराला संघटित करून राष्ट्र व समाज कार्यासाठीं अधिक प्रवण करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्या प्रयत्नांमुळेंच मठानुयायांमध्ये एक प्रकारची नवजागृति, नवचैतन्य येऊन विघटित सारस्वत समाजाच्या संघठनाच्या प्रक्रियेस विलक्षण गति आली.

श्रीमठाच्या बावीसहि स्वामीजींची परंपरा यापुढेंहि चालू रहावी, त्यांनी आचरिलेलीं व्रतवैकल्यें, जपतपें आपणहि आचरावीं, त्यांनी केलेल्या व संकल्पिलेल्या तीर्थयात्रा आपणाकडून घडाव्या आणि त्यांनी योजिलेलीं पण पूर्णत्वास न गेलेलीं सर्व कार्यें पूर्ण करावीं यासाठीं ते प्रामाणिक तळमळीने कार्यरत असतात. गत पंचवीस वर्षांच्या कारकीर्दींत श्रीसंस्थानच्या कक्षेंतील बहुतेक सर्व मठमंदिरांचे जीर्णोद्धार झाले, नूतन मूर्तींच्या प्रतिष्ठापना झाल्या, अनेक यज्ञयाग व अनुष्ठाने वैभवाने पार पडलीं, अनेक नव्या मठवास्तू उभारण्यांत आल्या आणि पुरातन पर्तगाळी मठाचा तर विस्तार-विकास होऊन कायाकल्पच करण्यांत आला. हीं सारीं महत्त्वाकांक्षी कार्यें चालू असताना संन्यास धर्माशीं निगडित सर्व कार्य कर्तव्यांचें शरिरयष्टि सहकार्य देत नसतानाही कटाक्षाने पालन करीत आहेत. त्याशिवाय त्यांनी धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म व वेदांत यांचा सतत अभ्यास चालू ठेवून त्याला आधुनिक विज्ञान, समाजशास्त्र, इतिहास आदि विषयांच्या चिकित्सक परिशीलनाची जोड देऊन आपली उपजत अभिजात प्रज्ञा सर्षांगांनी विकसित केली आहे. गेल्या पाव शतकाच्या कार्यकाळांत श्रीमठाची प्रतिष्ठा वाढून शिष्य परिवाराचा माथा उन्नत झाला आहे

आणि शिष्य परिवारहि अधिक विश्वासाने व भविष्याविषयींच्या अतूट श्रद्धेने श्रीमठाकडे आकृष्ट झाला आहे.

## महानिर्याण

१९७३ च्या मार्च महिन्यांत ते कर्नाटकात संचाराला गेले होते. दि. २३ मार्च रोजीं धर्मस्थळ या दक्षिण कन्नड गांवांत बाहुबली प्रस्थान सोहळ्यासाठीं स्वामीजी गेले. तेथील पूजाविधि वगैरे कार्यक्रम उरकून रात्रौ अंकोलेला मठांत वसतीला आले. या सोहळ्याच्या वेळीं स्वामीजी फार क्लांत दिसत होते. त्या दिवशीं त्यांचा रक्तदाब फार वाढला होता. पण त्याची पर्वा न करतां ते धर्मस्थळाला गेले होते.

तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं गोव्यांत बांदोडे येथें गौड सारस्वत ब्राह्मण समाजातर्फे आयोजित एका समारंभाच्या उद्‌घाटनास त्यांना उपस्थित राहायचें होतें. म्हणून त्या दिवशीं म्हणजे दि २५ मार्च रोजीं (शके १८९४, परिधावी संवत्सर, फाल्गुन वद्य ६, रविवार) अंकोले मठांत वस्तीला असलेल्या स्वामीजींनी पहाटे उठून स्नान, जपजाप्य, देवपूजा, नैवेद्य काढून व स्वतः भिक्षा घेण्याचा कार्यक्रम उरकून ते सव्वादहा वाजतां मोटारींत बसण्यासाठीं मठाबाहेर पडले. पर्तगाळ मठांत थोडी विश्रांती घेऊन पुढें बांदोड्याला जावें असा कार्यक्रम त्यांनी आंखला होता. परंतु मोटारींत चढण्यापूर्वींच त्यांची शुद्धि हरपली व ते खालीं कोसळले. ताबडतोब उपचार करण्यांत आले; पण उपचारांना यश न येतां दहाच मिनिटांनी म्हणजे १०-२५ वा. त्यांची प्राणज्योत मालवली.

ही दुःखद वार्ता वृत्तसंस्था व तारा-टेलिफोन द्वारे सर्वत्र पसरली. गोव्यांतून, कर्नाटकांतून हजारो लोक मिळेल त्या वाहनाने अंकोला येथें पोचले. शिष्यस्वामी श्री विद्याधिराजतीर्थही अंकोल्याला तांतडीने दाखल झाले.

अंकोला निवासी शिष्यवर्गाचा श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामीजींचें अंकोला मठांत वृंदावन असावे असा मनोदय होता. त्या मठांत श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थ, श्रीरमाकांततीर्थ आणि श्रीभूविजयरामचंद्रतीर्थ हे परंपरेतील तीन स्वामी मुक्त झाले होते. त्यांचीं वृंदावने आहेत. पण श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामी पर्तगाळ मठांत जाण्यास निघाल्यावेळीं त्यांचे महानिर्वाण झाल्याने पर्तगाळ मठांतच त्यांना वृंदावनस्थ करणे योग्य होईल असा निर्णय शिष्यस्वामींनी घेतला. अंकोलेकर मंडळीना त्यांना जड अंतःकरणाने

आपली मान्यता देणें क्रमप्राप्त झालें.

लगेच श्रीस्वामींचा पार्थिव देह एका उघड्या जीपमध्यें कमलासनानें ठेवण्यांत आला आणि अनेक लोकांसह जीप रामनामाच्या गजरांत रात्रौ १० वा. ४५ मि. वर पर्तगाळ मठांत पोंचली. वाटेंत ठिकठिकाणी शेंकडो लोकांनी साश्रु नयनांनी त्यांच्या पार्थिव देहाचें दर्शन घेतलें.

पर्तगाळी मठांतही हजारो लोक त्यांची प्रतिक्षा करीत होते. स्वामीजींची जीप पोचल्यानंतर पर्तगाळी मठांत पाय ठेवण्यास जागा शिल्लक नव्हती. असा लोक जमाव आजपर्यंत केव्हाच पर्तगाळी मठांत झाला नव्हता.

अशा प्रकारे एका कर्तबगार, कर्तव्यकुशल, लोकसंग्राहक व लोकप्रिय संन्याशाने कमलासनयुक्त स्थितींत वैकुंठगमन केलें!

गोव्यांत व इतर श्रीद्वारकानाथतीर्थांनी इतकी लोकप्रियता संपादन केली होती की कांही ठिकाणी स्वकीय समाजांतील व्यापाऱ्यांनीच नव्हे, तर इतरांनीही आपापलीं दुकानें बंद ठेवून दुःख प्रदर्शित केलें.

## गोव्याची मानवंदना

या वेळीं गोवा, दमण व दीव संघप्रदेशाच्या विधानसभेचें अधिवेशन चालू होतें. स्वामीजींचें निर्वाण होऊन त्यांना वृंदावनस्थ केलें त्याच्या दुसऱ्या दिवशीं मुख्यमंत्री कै. दयानंद बादोडकर यांनी सद्‌गदित अंतःकरणाने सभागृहांत प्रस्ताव मांडला. विरोधी पक्षाचे नेते डॉ. जॅक सिकैरा, उपनेते अनंत नरसिंह नायक आणि सरकार पक्षाचे आमदार वसंतराव जोशी यांनी प्रस्तावाला पाठिंबा देणारीं भाषणें केलीं. सभापती फुग्रो यांनी सभासदांच्या भावनांशीं सहमत होणारें भाषण केल्यावर दोन मिनिटें उभे राहून सभागृहाने प्रस्ताव संमत केला आणि गोव्यांत अलिकडच्या काळांत समाजास उपयुक्त असें मोलाचें कार्य करतां करतांच परमात्मापदीं लीन झालेल्या या संन्याशाच्या पावन स्मृतीला मानवंदना अर्पण करून अखिल गोमंतकातर्फे कृतज्ञता व्यक्त केली.

# श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींची कारकीर्द

## १. चातुर्मास्यव्रताचरण

| श्रीशक | इ. स. | मुक्काम स्थळ | गांव |
|---|---|---|---|
| १८६४ | १९४२ | श्रीसंस्थान पर्तगाळ मठ-गोवा. | (शिष्याश्रमीं) पर्तगाळ |
| १८६५ | १९४३ | श्रीसंस्थान पर्तगाळ मठ-गोवा. | (गुरुपीठारोहणोत्तर) पर्तगाळ |
| १८६६ | १९४४ | श्रीसंस्थान पर्तगाळ मठ-गोवा. | पर्तगाळ |
| १८६७ | १९४५ | श्रीमुरलीधर मठ | हळगा-कारवार |
| १८६८ | १९४६ | श्रीसंस्थान पर्तगाळ मठ-गोवा. | पर्तगाळ |
| १८६९ | १९४७ | श्रीलक्ष्मी व्यंकटेश देवस्थान | व्यंकटापूर (उ. कन्नड) |
| १८७० | १९४८ | श्रीगोकर्ण मठ | मंगळूर (द. कन्नड) |
| १८७१ | १९४९ | श्रीगोकर्ण मठ | मंगळूर (द. कन्नड) |
| १८७२ | १९५० | श्रीकाशीमठ, बाणगंगा | वाळुकेश्वर - मुंबई |
| १८७३ | १९५१ | श्रीद्वारकानाथ भवन (धेंपे विश्रांती गृह) | शिरोंण - गोवा |
| १८७४ | १९५२ | श्रीलक्ष्मी नरसिंह देवस्थान | वेलींग - गोवा |
| १८७५ | १९५३ | श्रीअणुजीवोत्तम मठ (व्यासाश्रम) | डिचोली - गोवा |
| १८७६ | १९५४ | श्रीअणुजीवोत्तम मठ (व्यासाश्रम) | डिचोली - गोवा |
| १८७७ | १९५५ | श्रीराम भवन | होन्नावर - (उ. कन्नड) |
| १८७८ | १९५६ | श्रीकृष्ण निवास | शिराली - (उ. कन्नड) |
| १८७९ | १९५७ | श्रीसरस्वती सदन (जयचामराज नगर) | हुबळी |

| | | | |
|---|---|---|---|
| १८८० | १९५८ | श्रीव्यंकटरमण देवस्थान | होन्नावर (उ. कन्नड) |
| १८८१ | १९५९ | श्रीद्वारकानाथ भवन | वडाळा - मुंबई |
| १८८२ | १९६० | श्रीद्वारकानाथ भवन | बसवनगुडी - बेंगळूर |
| १८८३ | १९६१ | श्रीद्वारकानाथ भवन | वडाळा - मुंबई |
| १८८४ | १९६२ | श्रीव्यंकटरमण देवस्थान | गंगोळी - (द. कन्नड) |
| १८८५ | १९६३ | श्रीव्यंकटरमण देवस्थान | कार्कळ - (द. कन्नड) |
| १८८६ | १९६४ | श्रीलक्ष्मी व्यंकटेश देवस्थान | सिद्धापूर - (उ. कन्नड) |
| १८८७ | १९६५ | श्रीमारुती मंदिर | शहापूर - बेळगांव |
| १८८८ | १९६६ | श्रीसरस्वती सदन (जयचामराज नगर) | हुबळी |
| १८८९ | १९६७ | श्रीसंस्थान पर्तगाळ मठ | (रजतोत्सव चातुर्मास) पर्तगाळ गोवा |
| १८९० | १९६८ | श्रीसंस्थान पर्तगाळ मठ | पर्तगाळ - गोवा |
| १८९१ | १९६९ | श्रीलक्ष्मी व्यंकटेश देवस्थान | पुत्तूर (द. कन्नड) |
| १८९२ | १९७० | श्रीसांतेरी कामाक्षी देवस्थान | कुमठा - (उ. कन्नड) |
| १८९३ | १९७१ | श्रीद्वारकानाथ भवन | वडाळा - मुंबई |
| १८९४ | १९७२ | श्रीगोकर्ण मठ | (चरम चातुर्मास) मंगळूर (द. कन्नड) |

# २ : प्रतिष्ठादि धार्मिक कार्यें

| दिनांक | स्थळ | कार्य | तपशील |
| --- | --- | --- | --- |
| ३-५-१९४६ अक्षय्यतृतिया | म्हाडदोळ | प्रतिष्ठा | श्रीमहालसा नारायणी, शांतादुर्गा परिवार देवतांची सकाळीं ७ वा. ५१ मि. वर प्रतिष्ठा |
| २०-१-१९५० | श्रीव्यंकटरमण देवस्थान, मंगळूर | सहस्र कलशाभिषेक व पुढील प्रासाद गोपुरावर सोन्याचा कलश स्थापन | काशीमठ व गोकर्णमठ उभय श्रीपाद हस्तें सपन्न झाले. |
| २२-२-१९५० | श्रीमहामाया देवस्थान, मंगळूर | रथोत्सव | उपस्थिति |
| १८-४-९५० | रामनाथी, गोवा. | अनुष्ठान | सर्व देवतांच्या कलाभिवृध्यर्थ महासुदर्शन व नवचंडी हवन. |
| ९-५-१९५१ | रामनाथी, गोवा | उद्घाटन | देवालयाच्या सभामंटपाचें उद्घाटन व शिखर कलश स्थापन |

| | | | |
|---|---|---|---|
| २५-४-१९५५ | श्रीसांतेरी कामाक्षी देवस्थान, कुमठा | प्रतिष्ठा | अक्षय्यतृतियादिनी श्रीदेवता प्रतिष्ठा होऊन नंतर दशमी-पर्यंत नवकुंडी विधानाने हवन पुरःसर श्रीमहाविष्णु, महारुद्र, शतचंडी सहस्त्र कलशार्चन वगैरे अनुष्ठाने झालीं. |
| ४-५-१९५५ | श्रीव्यंकटरमण देवस्थान, कुमठा | सहस्त्रकलश | पांच दिवस पर्यंत हवन पुरःसर श्रीमहाविष्णु, श्रीसूक्त, पुरुषसूक्त हवन, सहस्त्रकलशाभिषेक वगैरे अनुष्ठाने. |
| २६-५-१९५५ | श्रीलक्ष्मीव्यंकटेश देवस्थान, बळकूर | प्रतिष्ठा | देवालयांत जीर्णोद्धार प्रतिष्ठा |
| २९-६-१९५५ | श्रीगोपीनाथ देवस्थान, हळदीपूर | यज्ञसप्ताह | गायत्री मंत्राचा व कृष्ण-मंत्रादि जप व यज्ञ सप्ताह यथासांग पार पडला. |
| १५-३-१९५६ | श्रीव्यंकटरमण देवस्थान, कुंदापूर | अनुष्ठान | महाविष्णु हवन कार्य संपन्न |
| १०-२-१९५८ | हनुमट्टा, अंकोला | प्रतिष्ठा | श्रीलक्षमीनारायण महामाया देवालयांत श्री भगवती देवीची नूतन शिलाविग्रहाची पुनःप्रतिष्ठा व शतचंडी अनुष्ठान |

| | | | |
|---|---|---|---|
| १४-२-१९५९ | शिर्सी | अनुष्ठान | वेंकटरमण देवस्थानीं कलाभिवृद्धीनिमित्त श्रीदेवाचा शतकलशाभिषेक, सुदर्शन महायज्ञ वगैरे अनुष्ठाने. |
| २५-३-१९५९ | मुंबई | अनुष्ठान | वडाळामठीं गायत्री उपासक संघातर्फे सामुहिक उपनयनाचा कार्यक्रम व गायत्री महायज्ञ. |
| ८-५-१९५९ | म्हाडदोळ | प्रतिष्ठा | (पिंडिका) श्रीमहालसा नारायणी देवीच्या पिंडिकेचा जीर्णोद्धारपूर्वक पुनःप्रतिष्ठा. देवता सान्निधी करिता सुदर्शन हवन, महाविष्णु, नरसिंह हवन, शतचंडी लक्ष्मी हृदय पुरश्चरण पुरुष- सूक्त श्रीसूक्त विधान हवन व महालसा नारायणीस सहस्र कशाभिषेक वगैरे अनुष्ठानें. |
| १२ -५-१९६० | रिवण | प्रतिष्ठा | मठीं नूतन बांधलेल्या सभामंटपाची प्रासादशुद्धि होऊन श्रीरामचंद्रतीर्थ स्वामीजींच्या वृन्दावनांतील मूल मुख्यप्राणाची पुनः प्रतिष्ठा |

| | | | |
|---|---|---|---|
| १-३-१९६१ | माशें | प्रतिष्ठा | श्री निराकार स्तंभाची प्रतिष्ठा |
| २६-१-१९६२ | वडाळा, मुंबई | अनुष्ठान | अष्टग्रह दोष निवारणार्थ शत-चंडी हवन |
| ८-४-१९६३ | पुत्तूर | प्रतिष्ठा | मठाधीशत्रयांच्या सान्निध्यांत सपरिवार श्रीवेंकटेश देवाची प्रतिष्ठा. |
| १७-४-६३ | हौसदुर्गा, केरळ | प्रतिष्ठा | वेंकटरमण देवालयीं परिवार देवतांची प्रतिष्ठा श्रीपादांच्या उपस्थितींत. |
| १८-४-६३ | सिद्धापूर | प्रतिष्ठा | सभामंटपाचे उद्‌घाटन व शिखर कलश प्रतिष्ठा |
| २९-४-६३ | मुंबई | अनुष्ठान | मठवास्तूंत श्रीस्वारीच्या उप-स्थितींत महाविष्णू सुदर्शन हवन, नरसिंह हवन, धन्वन्तरी हवन वगैरे यज्ञानुष्ठान होऊन पुर्णाहुतीच्या दिवशीं श्रीकाशी मठाधीश व श्रीकैवल्य मठाधीश यांचें आगमन होऊन स्वामी-त्रयांचा सत्कार समारंभ. |
| ७-२-१९६५ | वडाळा, मुंबई | प्रतिष्ठा | नूतन श्रीराम मंदिरांत सकाळीं ९-३१ वाजतां मीन लग्नाच्या सुमुहूर्तावर श्रीसीता, लक्ष्मण सहित श्रीरामचंद्र देवाची प्रतिष्ठा |

| | | | |
|---|---|---|---|
| ७-३-१९६५ | पर्तगाळ | अनुष्ठान | श्री. पांडुरंग दत्ता तिंबले यांच्याकडून गायत्री पुरश्चरण अनुष्ठान |
| २१-६-१९६५ | होन्नावर | प्रतिष्ठा | श्रीवेंकटरमण देवालयीं प्रासादशुद्धी<br>शतकलशाभिषेक<br>शिखरकलशप्रतिष्ठा |
| ५-२-१९६६ | पर्तगाळ | प्रतिष्ठा | जीर्णोद्धारित गर्भगृहांत श्रीरामदेवाची पुनःप्रतिष्ठा आणि शिखरावर सुवर्ण कलश स्थापना. |
| २८-२-१९६६ | सागर | प्रतिष्ठा | नूतन बांधलेल्या श्रीवेंकटरमण देवालयीं देव प्रतिष्ठा |
| २६-२-१९६७ | मुंबई | दीक्षा समारंभ | श्रीराममंदिरांत पराभव संवत्सर माघ वद्य २या, रविवार दिनीं मठाच्या संप्रदायाप्रमाणें संन्यास होऊन श्रीमद् विद्याधिराजतीर्थ नामकरण करण्यांत आलें. |
| ४-२-६८ | डिचोली | प्रतिष्ठा | व्यासाश्रम मठांत देवतांची पुनःप्रतिष्ठा |
| ७-३-६८ | गोठण | अनुष्ठान | शांतादुर्गा देवालयीं सुदर्शन, नरसिंह चंडी हवन, शतकलशाभिषेक कार्ये |
| १८-५-६८ | बेळगांव | प्रतिष्ठा | कॅम्पमध्ये श्रीशंभुमंदिरांत देवता प्रतिष्ठा कार्य. |

| | | | |
|---|---|---|---|
| २-३-६९ | गंगोळ्ळी | अनुष्ठान | श्रीवेंकटरमण देवास सहस्त्र कुंभाभिषेक |
| ६-२-७० | होन्नावर | पर्वकाल | महोदय पर्वकालनिमित्त रामतीर्थामध्ये स्नान, जप, दान इत्यादिक. |
| ३-३-७० | होन्नावर | प्रतिष्ठा | मठांतील दहाजणांचा<br>१) श्रीरघुचंद्रतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी<br>२) श्रीलक्ष्मीकांततीर्थ श्रीपाद वडेर स्वामी या दोन्ही स्वाम्यांच्या जीर्णोद्धारित वृंदावनीं मुख्य प्राणाची पुनःप्रतिष्ठा. |
| ५-२-७१ | बंटवाळ | प्रतिष्ठा | हनुमंत देवाची प्रतिष्ठा मठाधीश त्रयांच्या उपस्थितींत. |
| १६-३-७१ | कडवाड | प्रतिष्ठा | श्रीवेंकटरमण देवाची पुनःप्रतिष्ठा |
| २८-४-७१ | पर्तगाळ | दीक्षा | दुर्गाराम बल हरिदास यांना संन्यासदीक्षा देऊन रामतीर्थ असें नामकरण केलें. |
| २३-१२-७१ | गोकर्ण | अनुष्ठान | हुनमानजींचा सुवर्ण महोत्सवांत महाविष्णु मन्युसूक्त हवन, सहस्त्र कलशाभिषेक. |
| २-१-७२ | भटकळ | अनुष्ठान | वडेरमठीं सुदर्शन, नरसिंह, लघु विष्णु हवन भागवत सप्ताह वाचन झालें. |

| | | | |
|---|---|---|---|
| २७-३-७२ | सावरकट्टा | प्रतिष्ठा | मुख्यप्राणाची प्रतिष्ठा |
| २२-५-७२ | हळदीपूर | प्रतिष्ठा | श्रीमुख्यप्राणांतर्गत श्रीलक्ष्मीवेंकटेश देवाची पुनःप्रतिष्ठा. |
| ३१-५-७२ | बसरूर | प्रतिष्ठा | स्वमठाचें जीर्णोद्धारकार्य पूर्ण करून श्रीदिग्विजय विठ्ठलाची पुनःप्रतिष्ठा |
| २६-६-७२ | रामनाथी | प्रतिष्ठा | श्रीवेताळ व श्रीकाळभैरव देवाची पुनःप्रतिष्ठा |
| ७-१२-७२ | जांबावली | प्रतिष्ठा | श्रीदामोदर संस्थानीं प्रासाद व शिखर कलश प्रतिष्ठा. चामुंडेश्वरी व नंदी प्रतिष्ठा. या समारंभास तिन्ही मठाधीश उपस्थित होते. |
| १६-१२-१९७२ | जांबावली | अनुष्ठान | श्रीदामोदर संस्थानीं हेगडेकर कुळाव्यांकडून सुदर्शन, नरसिंह हवन आणि सहस्र कलशाभिषेक |

## ३ : अन्य मठाधीशांच्या भेटी व समारंभ

| दिनांक | मुक्काम | विवरण |
|---|---|---|
| १४-११-१९४५ | कुमठा श्रीव्यंकटरमण देवालयीं | उडुपी फलिमारु मठाधीश श्रीरघुमान्यतीर्थ यांची भेट |
| २२-३-१९४६ | हुलेकल श्रीगोपालकृष्ण देवस्थानीं | १) श्रीभंडारकेरी विद्यामान्यतीर्थ<br>२) श्रीपेजावर विश्वेशतीर्थ<br>३) व्यासराज मठाधीश श्रीलक्ष्मी-शतीर्थ अशी तीन मठाधीशां बरोबर येथील स्वारीसह स्वागत समारंभ. |
| २३-३-१९४६ | सोंदे | सोंदे मठाधीश श्रीविश्वोत्तम तीर्थ सोंदे येथील त्यांच्या मठीं येथील श्रीपादांची भेट. |
| २३-३-१९४६ | हुलेकल | व्यासराज मठाधीश श्रीलक्ष्मीशतीर्थ यांच्या मठीं त्यांच्यासह स्वागत समारंभ. |
| २४-७-१९४८ | गोकर्ण मठ, मंगळूर | श्रीकाशीमठाधीशांचे शिष्य श्रीसुधींद्र-तीर्थ यांची भेट. |

| | | |
|---|---|---|
| १२-१२-१९४८ | पदवं, मंगळूर | काशीमठाधीश गुरु व शिष्य, उभयतांची भेट. |
| ३१-१-१९४९ आणि ४-२-१९४९ | पदंव, मंगळूर श्री वेंकटरमण देवस्थान, मंगळूर | काशीमठाधीश गुरु व शिष्य यांची भेट |
| १३-३-१९४९ | गोकर्णमठ, मंगळूर | पुत्तिगे मठाधीशांचे शिष्य श्रीसुज्ञानेंद्र-तीर्थ यांची भेट |
| १९-१-१९५० | पदंव, मंगळूर | श्रीकाशी मठाधीश श्रीसुधींद्रतीर्थ स्वामीचें आगमन व भेट. |
| २४-१-१९५० | श्रीव्यंकटरमण देवस्थान, मंगळूर | रथारोहण समयीं काशी आणि गोकर्ण मठ स्वामीजीचें आगमन व रथावर पूजा सेवा. |
| ३-१-१९५३ | श्रीकृष्ण मठ, उडुपी | पेजावर मठाधीश श्रीविश्वेशतीर्थ यांची भेट व श्रीकृष्ण संदर्शन. |
| ४-१-१९५३ | श्रीकृष्ण मठ उडुपी पर्याय पीठस्थ पेजावर श्रीविश्वेशतीर्थ यांच्या आमंत्रणाने श्रीमाध्व तत्त्वज्ञान सम्मेलन तीन दिवस चाललें होतें. | या समारंभांत पुढील पीठाधीशांची उपस्थिती होती<br>१) गोकर्ण मठाधीश<br>२) पर्याय स्वामी पेजावर विश्वेशतीर्थ<br>३) पुत्तिगे - श्रीसुधींद्रतीर्थ<br>४) फलिमारु - श्रीरघुवल्लभतीर्थ<br>५) अदमारु - श्रीविभुदेशतीर्थ<br>६) काणूर - श्रीविद्यासमुद्रतीर्थ व त्यांचे शिष्य विद्यावारितीर्थ<br>७) सोंदे - श्रीविश्वोत्तमतीर्थ |

| | | |
|---|---|---|
| | | ८) चित्रापूर - श्रीविद्यापूर्णतीर्थ<br>९) भंडारकेरी - श्रीविद्यामान्यतीर्थ<br>१०) सुब्रह्मण्य - श्रीविश्वज्ञतीर्थ<br>११) भीमनकट्टे - श्रीरघुतिलकतीर्थ<br>आणि उद्घाटक म्हैसूरचे महाराज श्रीजयचामराज राजेंद्र वडेर बहादूर उपस्थित होते. |
| १२-१-१९५३ | श्रीव्यंकटरमण देवस्थान, उडुपी | पेजावर मठाधीश व काणूर मठाधीश व सोंदे मठाधीश यांचा गोकर्ण मठाधीशांसह सत्कार समारंभ झाला. |
| ३१-१-१९५५ | श्रीकाशीमठ, वालुकेश्वर, मुंबई | मुंबई येथील वडाळा इमारतीच्या उद्घाटन समारंभास निमंत्रणावरून श्रीकाशी मठाधीश श्रीसुधींद्रतीर्थ स्वामीजी त्यांच्या मठीं येतांच उभय स्वामीजींची भेट झाली. |
| २८-१-१९५६ | तीर्थहळ्ळी | भीमनकट्टेमठीं मठाधीश श्रीरघुकुल तिलकतीर्थ स्वामी यांच्यासह स्वागत समारंभ. |
| २९-१-५६ | तीर्थहळ्ळी | जी. एस्. बी. समाजाच्या श्रीराम मंदिरांत येथील श्रीपादांसह भंडार केरी मठाधीशांस सन्मान समारंभ झाला. |
